। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २८३ वा । रविवार दिनांक २५ जानेवारी, २०२६ । पृष्ठ ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत कृष्णाथ रा. शेकापुर ता. जि. धाराशिव हे दि.२३.०१.२०२६ रोजी १०.०० वा. सु. आपल्या राहते घरासमोर अंदाजे १,५०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १५ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तर अमोल रा. पारधी वस्ती तेर ता. जि. धाराशिव ह.मु. येडशी टोलनाका ता. जि. धाराशिव हे दि.२३.०१.२०२६ रोजी १०.०० वा. सु. येडशी टोलनाका वजन काट्या जवळ बम बम भोले टी. हाउस बाजूला अंदाजे १,८०० किंमतीची १८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२३ जानेवारी रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ३०१ कारवाया करुन २,२८,२०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

# शौर्य आणि साधनेचा अद्भुत संगम म्हणजे श्री गुरु तेग बहाद्दूर यांचे जीवनकार्य-भैरवनाथ कानडे

धाराशिव दि.२४ जानेवारी (जिमाका) तलवार हातात असूनही मन ध्यानात रमलेले असणे, हेच खरे शौर्य आहे.धर्मासाठी उभे राहताना द्वेष नव्हे तर करुणा ठेवणे, हीच श्री गुरु तेग बहादुर साहेबांची महान शिकवण आहे.धर्मस्वातंत्र्य,मानवी मूल्ये आणि निर्भयतेसाठी दिलेले त्यांचे बलिदान आजच्या समाजासाठी दीपस्तंभ ठरत असून, श्री गुरु तेग बहादुर साहेबांचे योगदान म्हणजे शौर्य आणि साधना यांचा अद्भुत संगम आहे,असे प्रतिपादन जिल्हा मराठी भाषा समितीचे सदस्य भैरवनाथ कानडे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभाग व सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण विभाग,धाराशिव यांच्या वतीने 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री गुरु तेग बहादुर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम तसेच श्री गुरु गोविंद सिंग जी यांच्या ३५० व्या गुरुतागदी शताब्दी समागम वर्षानिमित्त आयोजित व्याख्यान व बक्षीस वितरण कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,धाराशिव येथे उत्साहात पार पडला.या कार्यक्रमात श्री गुरु तेग बहादुर साहेब यांचे जीवनकार्य या विषयावर प्रमुख व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री.कानडे बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धाराशिव येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक श्री.अमोल ताकभाते हे होते,प्रमुख पाहुणे म्हणून इतर मागास बहुजन कल्याण विभाग, लातूर येथील प्रादेशिक उपसंचालक डॉ.तेजस माळवदकर तर प्रमुख वक्ते म्हणून शिक्षक भैरवनाथ कानडे उपस्थित होते.

याच कार्यक्रमात आश्रम शाळा क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या मैदानी सांघिक तसेच विविध वैयक्तिक क्रीडा स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले.क्रीडा स्पर्धांतील विजेत्यांना प्रादेशिक उपसंचालक,इतर मागास बहुजन कल्याण विभाग,लातूर डॉ.तेजस माळवदकर तसेच श्री.भैरवनाथ कानडे यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.

या वेळी बोलताना डॉ.माळवदकर यांनी सांगितले की,क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त,आत्मविश्वास व नेतृत्वगुण विकसित होतात आणि अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण विभाग,श्री.अमोल ताकभाते यांनी अध्यक्षीय भाषणात, गुरु तेग बहादुर साहेबांचे बलिदान केवळ एका धर्मापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण मानवतेच्या रक्षणासाठी दिलेले होते.अशा महापुरुषांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमासाठी व्यासपीठावर सचिन नटवे,विकास राठोड,संदेश घुगे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे संचालन श्री.दयानंद राठोड यांनी केले. 'हिंद-दी-चादर' या कार्यक्रमातून श्री गुरु तेग बहादुर साहेबांच्या शौर्य, साधना व मानवतेच्या विचारांचा जागर झाला असून उपस्थितांसाठी हा कार्यक्रम प्रेरणादायी व दिशादर्शक ठरला.

### तलवार जप्त करुन शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, ज्ञानेश्वर सुरेश सोनमुखे, वय ३० वर्षे, रा.एसार पेट्रोल पंपाच्या समोर गार भवानी मंदीराच्या बाजूला परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.२३.०१.२०२६ रोजी सिना कोळेगाव कॉलनीचे समोर रोडवर परंडा येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असी तलवार ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला परंडा पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद तलवार जप्त करुन फिर्यादी नामे-सागर दादासाहेब कंचे पोलीस अमंलदार नेमणुक पोलीस ठाणे परंडा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ अन्वये परंडा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### मोटारसायकलवरून पाडून केली मारहाण

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी आसिफ चाँद शेख, वय २१ वर्षे, रा. हमीद नगर ता. उमरगा जि. धाराशिव यांनी हे व त्यांचे मित्र किरण व शहानवाज हे दि.२१.०१.२०२६ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान नाईकनगर शिवार येथे अनोळखी तीन इसमांनी शहानवाज यास मोटरसायकलवरुन खाली ओढुन पाडले व फिर्यादीच्या उजवे व डावे हातावर पट्याने व काठीने मारहाण करुन गंभीर जखमी केले. आसिफ शेख यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे मुरुम येथे ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.




ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## राज्यातील उद्योगास चालना मिळावी

राज्यात अनेक उद्योगपती, कारखानदार आहेत. आपण परदेशिय गुंतवणुक वाढवी या बाबत आग्रही असतोत. परदेशियांनी आपल्या राज्यात गुंतवणुक करून कारखानदारी वाढवावी असे वाटते. राज्यातील बेकारी कमी व्हावी असा दृष्टिकोन राज्यकर्त्यांचा सतत असतो. त्यामुळे मुख्यमंत्री सह राज्यातील मंत्रीगण दाओस येथे जातात व काही तरी गुंतवणुकीत यश मिळवितात. राज्यकर्त्यांचा हा प्रयत्न चांगला आहे. त्स्युत्य आहे. परदेशिय गुंतवणुक बरोबर राज्यातील उद्योगपती-कारखानदार यांना प्रोहत्सान देण्याची गरज आहे. देशात इतर राज्यात नसतील असे शेकडो वर्षापासूचे कारखानदार, उद्योगपती महाराष्ट्रात होते व आहेत. मराठे, किर्लोस्कर, बजाज, टाटा अशी किती तरी महाराष्ट्रीयन उद्योगपतीची नावे आहेत. ही नावे नावजलेली आहेत. भारतात काय परदेशात सुद्धा यांची कारखानदारी चालू आहे. महाराष्ट्राचे नाव त्यांनी गाजविले आहे व गाजवित आहेत. अशा उद्योगपतींनी जर लक्ष दिले किंवा अशा उद्योगपतींना चालना दिली तर अधिक लाभदायक ठरणारे आहे. राज्यात अनेक कारखानदारी यासाठी की, दोन किंवा चार चाकी गाड्याचे उत्पादन, टाटा, मारूती उद्योग मोठ्या प्रमाणात विविध जिल्ह्यात उघडली पाहिजेत. काही झाले तरी उद्योगाचे जाळे निर्माण झाले पाहिजे. ते झाले तर आपोआप गरजवंताच्या हाताला काम मिळेल. बेरोजगारी संपण्यात मदत होणार आहे. सध्याला काय होते. राज्यात शिक्षणाचे व पदवीघेणाऱ्याचे प्रमाण वाढते आहे. शिकलेल्यांना नोकऱ्या मिळत नाहीत. जागतिक मंदी आल्याने अनेकांच्या नोकऱ्यावर संकट आले आहे. ट्रम्प यांचे धोरणाचा फटका काही प्रमाणात बसला आहे. राज्यात ज्यावेगाने गुंतवणुक अपेक्षित आहे त्या प्रमाणात होताना दिसून येत नाही. महाराष्ट्र व गुजरात राज्यातील तुलनात्मक विचार केला तर महाराष्ट्र मागे आहे. गुजरात आपल्यापेक्षा विकासाच्या बाबतीत पुढे आहे. कारखानदारीत पुढे आहे. सध्याला चिरमुरे किंवा मुरमूरे पासून सोने-चांदी हिऱ्याची बाजारपेठ गुजरात आहे. राज्यातील कुटीरउद्योगास राज्य सरकारने चालना दिली पाहिजे. राज्यात ग्रामीण भागात अनेक कुशलकारगिरी आहेत. हस्तकलेचे कारागिरी आहेत त्यांनी केलेले कौशल्यावर बाजारात चांगली मागणी आहे. वाटेल त्या किंमतीवर खरेदी केल्या जातात. त्यामुळे ग्रामीण भागातील सुतार, लोहार तसेच कुंभार हे जे कामात कुशल आहेत, त्यांच्या केलेची किंमत केली पाहिजे. मोठ्या शहरात त्यांनी कला सादर केली तर त्यांच्या वस्तूला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. अनेक जन जुगाड तयार करून कलेचे प्रदर्शन घडवितात. त्यामुळे राज्यातील कुशल कारागिरींचा शोध घेवुन चालना दिली पाहिजे. परदेशातील मग ते पुर्वीचे भारतीय असोत किंवा भारतीयवंशाचे असोत त्यांना वारंवार विनंती केली जाते की, राज्यात गुंतवणुक करा. राज्यात कारखानदारी सुरू करा. त्यांना सरकारकडून काही सवलती दिल्या जातात. करात सवलती दिली जाते. अशा विविध सवलती देवुन गुंतवणुकीस भाग पाडले जाते. त्याचाही प्रयत्न झाला पाहिजे. त्या बरोबर राज्यात जे जुने कारखानदार आहेत. उद्योगपती आहेत. ते आता अधिक गुंतवणुक करण्यात मागे आहेत. कारखानदारीत मागे आहेत. त्यांना पुढे आणणे आवश्यक आहेत. कारखानदारीस वातावरण निर्माण केले पाहिजे. एखादा उद्योगपती एखाद्या ठिकाणी उद्योग सुरु करताना पाहिल्यांदा तो दळणवळणाचे मार्ग शोधतो. रेल्वे, विमानसेवा किंवा उद्योगापासून जवळच मोठा रस्ता पाहातो. आपल्या कारखान्यात उत्पादीत माल सहज मार्केटमध्ये जाईल व अधिक विक्री होवू शकेल हा विचार मनात घेवुन कारखानदारी सुरू केली जाते. कारखाना उभा करण्यासाठी लागणाऱ्या सुविधेचा पहिल्यांदा विचार केला जातो. त्या सुविधा राज्यसरकारला पुरवाव्या लागतात. त्यापेक्षा पहिल्यांदा राज्यातील बंद पडलेली कारखानदारी कशी सुरु करता येईल का याचा विचार झाला पाहिजे. वेळीच जर अधोगतीस आलेल्या कारखानदारीस पुर्नजीवन केले पाहिजे. याचा विचार केला पाहिजे. तरच बंद पडलेली कारखानदारी पुन्हा सुरु होवू शकते. सध्याला कमावुन बसलेले उद्योगपतींना पुन्हा त्यात मेहनत घेण्याचा विचार नसतो. भरपूर कमाई केलेली असते. त्यामुळे राज्यसरकारने ज्या नवीन उद्योगपतीस कारखाना चालू करण्यात आवड आहे त्यांनाच प्रोहत्सान देण्याची गरज आहे. अनेक ठिकाणी सरकारची उद्योगासाठी जागा मिळविली आहे. सवलती मिळविल्या आहेत नंतर कारखानाच चालू केला नाही. अशांची संख्या राज्यात किती आहे या बाबत गणना केली पाहिजे. सवलती घेवून कारखानदारीच चालू न करणाऱ्याचा शोध घेवून त्यांना कारखानदारी पुन्हा चालू करण्यात भाग पाडले पाहिजे. नवीन गुंतवणुकदार किंवा कारखानदारास आणणे हे चालूच ठेवून जुन्याचा विचार केला पाहिजे. नसता एकीकडे नवीन चालू करावयाचे व जुन्याकडे दुर्लक्ष केले जात असेल तर ते योग्य नाही. राज्यात किर्लोस्कर, बाजाज, टाटासारखी मंडळी आहे. किर्लोस्कर कंपन्यास चालना दिली पाहिजे. त्यांच्याकडे जागा आहे. जुनी मशिनरी आहे. तसेच हामगाम कापड उद्योगास चालना देवून नवीन मशिनरीसाठी आर्थिक मदत केली पाहिजे. त्यामुळे ते स्पर्धेत उतरून अनेकांना रोजगार देण्यात सक्षम होतील. राज्यात अनेक कारखाने बंद पडत गेली आहेत. त्यामागील कारणांचा शोध घेतला पाहिजे. कोणत्या कारणामुळे बंद पडली. अनेकांची कारखानदारी बंद पडल्याने शेकडो कामगार बेकार झाले आहेत. मुंबईत काय स्थिती आहे. अनेक गिरण्यांचे भोंगे बंद झाल्याने शेकडोच्या संख्येने कामगार उपासमारीची वेळ आली होती. गिरणीमालकांनी लाखो, अब्जोंच्या दरात जागा विकून तेथे मोठ-मोठे मॉलची उभारणी झाली आहे. घराची निर्मिती झाली आहे. वास्तविक कारखानदारी एकदा उभा राहीली की बंद पडता कामा नये. काही झाले तरी कारखादानदारी चालली तर शेकडोंच्या संख्येने हाताला काम मिळेल. त्यामुळे राज्यात सुख, समाधान व शांती लाभते. केवळ परदेशिय गुंतवणुकीडे लक्ष देणे तसे योग्य नाही. मात्र राज्यातील बंद पडलेली कारखानदारी असो किंवा नवीन उभारणी करणारे असोत त्यांना चालना दिली पाहिजे. त्यामुळे पाहिल्यांदा धोरण हे राज्यातील स्थानिक उद्योगपतीस प्राधान्य असले पाहिजे. स्थानिक जिल्हास्तरीय उद्योगास चालना दिली पाहिजे. जिल्हा उद्योग केंद्र हे देखावे नसावेत. प्रत्यक्षात त्याचा लाभ जिल्ह्यातील तरूणांना मिळाला पाहिजे असे धोरण राबविले पाहिजे. इतर प्रांतातील उद्योग राज्यात येतीलच असे नाही. त्यामुळे एकदा राज्यातील बंद पडलेली कारखानदारीचा सर्वे करावा. बंद असणाऱ्यास चालना द्यावी. नवीन गुंतवणुकीस भाग पाडावे कुटीर उद्योगास चालना दिली पाहिजे. यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीस वाव मिळेल. त्याच प्रमाणे बेरोजगारीचा प्रश्न मिटण्यास मदत होणार आहे.

# ग्रुप सेंटर, सी.आर.पी.एफ., पुणे येथे रोजगार मेळ्याच्या १८व्या टप्प्याचे आयोजन

- ३०० नवनियुक्त उमेदवारांना नियुक्तीपत्रांचे वितरण
- सर्वसमावेशक विकास आणि आर्थिक सक्षमीकरण यांच्यावर केंद्र सरकारचे लक्ष - मुरलीधर मोहोळ






**पुणे/पीआयबी:** ग्रुप सेंटर, केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ), पुणे येथे आज (शनिवार, २४ जानेवारी २०२६) १८व्या टप्प्यातील रोजगार मेळा अत्यंत उत्साहपूर्ण व सन्माननीय वातावरणात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास मुरलीधर मोहोळ, माननीय खासदार, पुणे तसेच माननीय राज्यमंत्री, सहकार व नागरी विमान वाहतूक मंत्रालय, भारत सरकार, हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते.

गृह मंत्रालयाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या राष्ट्रव्यापी कार्यक्रमांतर्गत देशातील ४५ निवडक ठिकाणी ६१,००० पेक्षा अधिक नव्याने नियुक्त झालेल्या युवकांना नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली. ग्रुप सेंटर, सीआरपीएफ, पुणे येथे सीआरपीएफ, बीएसएफ, आयटीबीपी, एसएसबी, आसाम रायफल्स, बँक ऑफ बडोदा, युनियन बँक ऑफ इंडिया, ईपीएफओ व आयआयजीएम येथील ३०० निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती पत्रांचे वितरण करण्यात आले. हे नव्याने नियुक्त झालेले युवक भारत सरकारच्या विविध मंत्रालये व विभागांमध्ये कार्यभार स्वीकारून प्रशासन व सार्वजनिक सेवा वितरण अधिक सक्षम करण्यासाठी आपले योगदान देतील.

या प्रसंगी माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी आभासी पद्धतीने नियुक्ती पत्रांच्या वितरणाचा शुभारंभ केला व नव्याने नियुक्त उमेदवारांना संबोधित केले. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की ही नियुक्ती पत्रे केवळ नोकरीची ऑफर नसून, विकसित भारत २०४७ या प्रवासात सक्रिय सहभागासाठीचे आमंत्रण आहे. विविध देशांसोबत करण्यात येणारे मुक्त व्यापार करार (एफटीए) युवकांसाठी अधिक संधी निर्माण करतील, असेही त्यांनी नमूद केले. तसेच जीएसटी २.०, आयकर सवलती, मेक इन इंडिया उपक्रम आणि जागतिक समुदायाचा भारतावर वाढता विश्वास यामुळे देशाची अर्थव्यवस्था अधिक बळकट झाली असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. देशाच्या प्रगती व विकासासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

आपल्या संबोधनात मुख्य अतिथी श्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले की संपूर्ण देश माननीय पंतप्रधानांच्या विकसित भारत २०४७ या दृष्टिकोनाची अंमलबजावणी करण्यासाठी कटिबद्ध आहे. कौशल्य विकास, मुद्रा योजना, स्टार्ट-अप इंडिया तसेच इतर युवकाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून सरकारने स्वरोजगाराच्या माध्यमातून कोट्यवधी रोजगार संधी निर्माण केल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच समावेशक विकास व आर्थिक सशक्तीकरणावर सरकारच्या ठोस भरामुळे सध्याच्या काळात रोजगार संधींमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यापूर्वी वैभव निम्बाळकर, भा.पु. से., उप महानिरीक्षक, ग्रुप सेंटर, सीआरपीएफ, पुणे यांनी मुख्य अतिथींचे औपचारिक स्वागत व सत्कार केला. आपल्या भाषणात त्यांनी रोजगार मेळ्याला पारदर्शक व गुणवत्ताधारित भरती प्रक्रियेद्वारे राष्ट्रनिर्मितीकडे नेणारा परिवर्तनकारी उपक्रम असल्याचे सांगितले. ग्रुप सेंटर, सीआरपीएफ, पुणे हे एक जबाबदार आयोजक म्हणून अशा राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमांचे सुसूत्र, शिस्तबद्ध व सन्माननीय आयोजन करण्यासाठी पूर्णतः कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, नव्याने नियुक्त उमेदवारांनी राष्ट्रसेवेच्या काळात प्रामाणिकपणा, शिस्त व कर्तव्यनिष्ठेचे सर्वोच्च मानदंड जपावेत, असे आवाहन त्यांनी केले.

नव्याने नियुक्त उमेदवारांनी या दूरदर्शी उपक्रमासाठी माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. सरकारी सेवेत प्रवेशासाठी आपल्याला निष्पक्ष, पारदर्शक व समान संधी मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. त्यांनी निष्ठा, प्रामाणिकपणा व समर्पणभावनेने राष्ट्रसेवा करण्याची आपली कटिबद्धता अधोरेखित केली. तसेच उत्कृष्ट व्यवस्था व सुरळीत आयोजनाबद्दल केंद्रीय राखीव पोलीस दलाचे कौतुक करून, ग्रुप सेंटर, सीआरपीएफ, पुणे येथे आयोजित रोजगार मेळ्याच्या सुव्यवस्थित संचालनाची प्रशंसा केली.

## आ. अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या भेटी घेत साधला संवाद



**लातूर /प्रतिनिधी:**राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि.२४ जानेवारी रोजी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्थाचे पदाधिकारी, काँग्रेस पक्ष पदाधिकारी, नागरिक यांच्या भेटी घेत त्यांच्या अडीअडचणी समस्या समजून घेत त्यांच्याशी संवाद देखील साधला. तसेच त्यांची निवेदने,निमंत्रनाचा स्वीकार करीत संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यासोबतच जिल्हा परिषद व पंचायत समिती स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकच्या अनुषंगाने काँग्रेस व मित्र पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष- संतोष देशमुख, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन ऍड.समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख,लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष- श्रीशैल उटगे,चंद्रकांत मद्दे,चाकुर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष-धनंजय कोरे, दिलीप माने, योगेश स्वामी,रामदास चव्हाण,महेबूब कारभारी,लता लोभे, निलेश देशमुख,विकास लोभे,ऋषिकेश यमगर, विद्याधर मादळे,व्यंकटेश पुरी, प्रभाकर बंडगर, डॉ. बालाजी साळुंखे,संजय खाडे,मनोज देशमुख,अरफ़ात खान,सलीम इनामदार,स्वयंप्रभा पाटील, मोहन सुरवसे, मुरलीधर निकम,राम मिटकरी, राजू किसवे, श्रीधर पाटील,युसुफ शेख,जावेद शेख,सिकंदर पटेल,गणपत महाराज माकणे,अतुल नायक, विजय पतंगे आदिसह राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी,कार्यकर्ते,महिला भगिनी,नागरिक उपस्थित होते.

# मतदार : भारतीय लोकशाहीचा आत्मा



२५ जानेवारी हा दिवस भारतात 'राष्ट्रीय मतदार दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका औपचारिक शासकीय कार्यक्रमापुरता मर्यादित नसून भारतीय लोकशाहीच्या आत्म्याशी जोडलेला एक अत्यंत महत्त्वाचा सामाजिक आणि राजकीय संदर्भ आहे. लोकशाही व्यवस्थेची खरी ओळख तिच्या संविधानात, संस्थांमध्ये किंवा कायद्यांमध्ये नसून तिच्या मतदारांमध्ये असते. मतदार हा लोकशाहीचा कणा आहे. त्याच्या जाणीवेवर, सहभागावर आणि सामाजिक भानावर लोकशाहीची दिशा ठरते. म्हणूनच राष्ट्रीय मतदार दिन हा केवळ मतदार नोंदणी किंवा मतदानाची प्रक्रिया आठवण करून देणारा दिवस नसून, मतदार म्हणून नागरिकाची सामाजिक, नैतिक आणि राजकीय भूमिका पुन्हा तपासण्याचा एक महत्त्वाचा क्षण आहे.

भारतीय लोकशाहीचा प्रवास हा जगातील सर्वात मोठा आणि सर्वात विविधतेने भरलेला लोकशाही प्रयोग मानला जातो. स्वातंत्र्यानंतर भारताने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार स्वीकारण्याचा निर्णय घेतला, तो केवळ राजकीय नव्हे तर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातूनही क्रांतिकारी होता. त्या काळात भारतात निरक्षरतेचे प्रमाण मोठे होते, दारिद्र्य व्यापक होते आणि जात, वर्ग, लिंग व धर्माच्या आधारे समाज खोलवर विभागलेला होता. अशा परिस्थितीत प्रत्येक प्रौढ नागरिकाला समान मताचा अधिकार देणे हे केवळ धाडसीच नव्हे, तर सामाजिक समतेवर आधारित लोकशाहीची ठाम भूमिका मांडणारे पाऊल होते. या निर्णयामुळे भारतीय समाजातील वंचित, दुर्लक्षित आणि उपेक्षित घटकांना राजकीय मंचावर स्थान मिळाले आणि सत्तेच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता लोकशाही ही केवळ शासनाची पद्धत नसून ती एक व्यापक सामाजिक प्रक्रिया आहे. समाजातील मूल्ये, परंपरा, सत्तासंबंध, आर्थिक रचना आणि सांस्कृतिक घटक यांचा लोकशाहीवर खोल परिणाम होत असतो. मतदार हा या सर्व घटकांच्या संगमातून घडलेला असतो. व्यक्तीचे मतदानवर्तन हे केवळ तिच्या वैयक्तिक पसंतीवर आधारित नसते, तर तिच्या सामाजिक ओळखीवर, जीवनानुभवांवर आणि सामूहिक वास्तवावर आधारित असते. जातीय रचना, वर्गीय विषमता, शैक्षणिक संधी, रोजगाराची स्थिती, लिंगसंबंध आणि माध्यमांचा प्रभाव या सर्वांचा मतदानावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम होत असतो.

भारतीय राज्यघटनेने मतदाराला केवळ मताचा अधिकार दिला नाही, तर त्या अधिकारामागे सामाजिक न्यायाची आणि समतेची व्यापक संकल्पना मांडली. संविधानातील समानतेचे तत्त्व, मूलभूत हक्क आणि राज्याची मार्गदर्शक तत्त्वे ही सर्व मतदाराच्या सशक्तीकरणाशी जोडलेली आहेत. मतदानाच्या माध्यमातून नागरिक केवळ प्रतिनिधी निवडत नाही, तर तो शासनाच्या दिशेला, धोरणांना आणि प्राधान्यांना आकार देतो. त्यामुळे मत देणे हा केवळ अधिकार नसून तो एक सामाजिक कर्तव्य आहे, असे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ठामपणे म्हणता येते.

राष्ट्रीय मतदार दिनाची संकल्पना मतदार नोंदणी वाढविणे, मतदानाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि लोकशाही मूल्यांचे जतन करणे या उद्देशाने राबविली जाते. मात्र लोकशाहीची गुणवत्ता केवळ मतदानाच्या टक्केवारीवर मोजता येत नाही. माहितीपूर्ण, विवेकी आणि जबाबदार मतदान ही खरी लोकशाहीची कसोटी असते. आजच्या काळात माध्यमांचा वाढता प्रभाव, जाहिराती, सोशल मीडिया, भावनिक प्रचार आणि ओळखींचे राजकारण यामुळे मतदाराच्या निर्णयप्रक्रियेवर अनेक प्रकारचे दबाव निर्माण होत आहेत. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसते की जेव्हा माहिती अपुरी, एकांगी किंवा चुकीची असते, तेव्हा मतदान भावनांवर आधारित होते आणि लोकशाहीची गुणवत्ता घसरते.

मतदान संस्कृती ही कोणत्याही समाजाच्या लोकशाही परिपक्वतेचे प्रतिबिंब असते. मतदान ही केवळ निवडणुकीच्या दिवशी पार पाडायची प्रक्रिया नसून ती दीर्घकाळ घडत जाणारी सामाजिक संस्कारांची प्रक्रिया आहे. कुटुंब, शाळा, महाविद्यालये, समाज, माध्यमे आणि सार्वजनिक चर्चेच्या माध्यमातून मतदानाबाबतची मूल्ये आणि भूमिका घडत असतात. ज्या समाजात मतभिन्नतेचा सन्मान केला जातो, प्रश्न विचारण्याची मुभा असते आणि विवेकी चर्चेला स्थान असते, त्या समाजात मतदान अधिक सशक्त आणि अर्थपूर्ण ठरते. याउलट ज्या ठिकाणी भीती, दबाव, प्रलोभन किंवा संकुचित ओळखी प्रभावी असतात, तेथे मतदानाची प्रक्रिया मर्यादित होते.

भारतीय समाजात मतदान संस्कृती हळूहळू विकसित होत गेली आहे. सुरुवातीच्या काळात अनेक नागरिकांसाठी मतदान ही नवीन आणि अपरिचित संकल्पना होती. कालांतराने निवडणुकांची सातत्यपूर्ण प्रक्रिया, राजकीय चळवळी आणि सामाजिक जागरूकता यामुळे मतदान हे नागरिकत्वाचे महत्त्वाचे लक्षण बनले. तरीही आजही काही भागांत जातीय समीकरणे, स्थानिक सत्तासंबंध, आर्थिक प्रलोभने आणि दबाव मतदानावर प्रभाव टाकताना दिसतात. या वास्तवाकडे डोळसपणे पाहूनच लोकशाही अधिक सुदृढ करण्याचे प्रयत्न करावे लागतील.

महिलांचा मतदानातील सहभाग हा समाजातील लिंगसमानतेचा आणि सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा निर्देशांक मानला जातो. भारतात दीर्घकाळ महिलांना सार्वजनिक आणि राजकीय क्षेत्रापासून दूर ठेवले गेले होते. पितृसत्ताक रचना, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक बंधने यामुळे महिलांचा राजकीय सहभाग मर्यादित राहिला. मात्र स्वातंत्र्यानंतर सार्वत्रिक मताधिकारामुळे महिलांना मतदानाचा हक्क मिळाला आणि हळूहळू त्यांच्या सामाजिक भूमिकेत बदल घडू लागला. गेल्या काही दशकांत महिलांच्या मतदानाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. अनेक निवडणुकांमध्ये महिला मतदारांचे प्रमाण पुरुषांच्या बरोबरीने किंवा काही वेळा त्याहून अधिक आढळते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता हा बदल महिलांच्या शिक्षणात वाढ, आर्थिक सहभाग, स्वयं-सहायता गट, स्थानिक स्वराज्य संस्थांतील आरक्षण आणि वाढते सामाजिक आत्मभान यांचा परिणाम आहे.

तरुण मतदार हा भारतीय लोकशाहीचा भविष्यकाळ आहे. भारताची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर तरुण असून १८ ते २९ वयोगटातील मतदारांची संख्या लक्षणीय आहे. तरीही अनेक वेळा तरुणांमध्ये मतदानाबद्दल उदासीनता दिसून येते. बेरोजगारी, अस्थिर रोजगार, स्थलांतर, शिक्षणाचा ताण आणि राजकारणाबद्दलची नाराजी यामुळे काही तरुण लोकशाही प्रक्रियेपासून दूर राहतात. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसते की जेव्हा तरुणांना राजकारणात आपले प्रश्न, आकांक्षा आणि भविष्य प्रतिबिंबित होताना दिसत नाही, तेव्हा ते मतदानाकडे पाठ फिरवतात. मात्र पर्यावरण, सामाजिक न्याय, शिक्षण, रोजगार, भ्रष्टाचारविरोधी चळवळी आणि नागरिक हक्क यांसारख्या मुद्द्यांवर तरुणांचा सहभाग वाढत असल्याचेही स्पष्टपणे दिसते. राष्ट्रीय मतदार दिन हा तरुणांना माहितीपूर्ण, चिकित्सक आणि सक्रिय मतदार म्हणून घडविण्याची एक महत्त्वाची संधी आहे.

ग्रामीण आणि शहरी मतदारांच्या वर्तनात समाजशास्त्रीय फरक स्पष्टपणे आढळतात. ग्रामीण भागात अजूनही नातेवाईक संबंध, स्थानिक नेतृत्व, जातीय रचना आणि थेट संपर्क यांचा प्रभाव अधिक असतो. शहरी भागात माध्यमे, विकासाचे मुद्दे, पायाभूत सुविधा, रोजगार आणि जीवनशैलीशी संबंधित प्रश्न अधिक प्रभावी ठरतात. तथापि, शिक्षण, संपर्क, स्थलांतर आणि तंत्रज्ञानाच्या वाढीमुळे हे विभाजन हळूहळू कमी होत आहे. ग्रामीण भागातही मुद्देसूद आणि जाणीवपूर्वक मतदान वाढत आहे, तर शहरी भागातही भावनिक आणि ओळखींचे राजकारण काही प्रमाणात प्रभावी ठरत आहे. त्यामुळे मतदार वर्तन हे स्थिर नसून सतत बदलणारे सामाजिक वास्तव आहे.

मतदार शिक्षण आणि जनजागृती कार्यक्रमांची भूमिका लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. निवडणूक आयोगाने मतदार नोंदणी, मतदान प्रक्रिया, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यांविषयी जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविले आहेत. मात्र समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रभावी मतदार शिक्षण हे केवळ तांत्रिक माहितीपुरते मर्यादित नसावे. त्यात राज्यघटनेची मूल्ये, मूलभूत हक्क व कर्तव्ये, सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांचा समावेश असणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि माध्यमांनी दीर्घकालीन पातळीवर मतदार शिक्षणासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

लोकशाही व्यवस्थेतील विश्वास हा एक नाजूक पण अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. मतदारांचा निवडणूक प्रक्रिया, राजकीय संस्था आणि लोकप्रतिनिधींवर विश्वास असेल तर लोकशाही सुदृढ राहते. भ्रष्टाचार, अपारदर्शकता, खोटे आश्वासने आणि नैतिकतेचा अभाव यामुळे हा विश्वास डळमळीत होऊ शकतो. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे स्पष्ट होते की जेव्हा लोकांना व्यवस्था आपली वाटत नाही, तेव्हा ते मतदानापासून दूर राहतात किंवा निष्क्रिय बनतात. त्यामुळे राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने लोकशाही संस्थांवरील विश्वास पुनर्स्थापित करणे ही सामूहिक जबाबदारी आहे.

मतदान न करणे हाही एक सामाजिक संदेश असतो. अनेकदा मतदान न करण्यामागे निराशा, पर्यायांचा अभाव किंवा व्यवस्थेवरील अविश्वास कारणीभूत असतो. परंतु ही निष्क्रियता लोकशाहीसाठी घातक ठरू शकते. मतदान न केल्याने निर्णय इतरांच्या हाती जातो आणि प्रतिनिधित्वातील तफावत वाढते. त्यामुळे प्रत्येक मतदाराने आपल्या मताचे सामाजिक आणि राजकीय महत्त्व ओळखणे आवश्यक आहे. लोकशाहीत बदल घडविण्याचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे मतपत्रिका हे राष्ट्रीय मतदार दिन ठामपणे अधोरेखित करतो.

डिजिटल युगात लोकशाहीसमोर नव्या संधी आणि आव्हाने उभी आहेत. सोशल मीडिया, ऑनलाइन माहिती आणि डिजिटल संवादामुळे नागरिकांचा सहभाग वाढू शकतो. मात्र त्याचबरोबर चुकीची माहिती, अफवा, द्वेषपूर्ण प्रचार आणि ध्रुवीकरण यांचे धोकेही वाढले आहेत. समाजशास्त्रीयदृष्ट्या डिजिटल साक्षरता ही आधुनिक मतदार साक्षरतेचा अविभाज्य भाग बनली आहे. माहितीची पडताळणी, विवेकी विचार आणि जबाबदार अभिव्यक्ती या कौशल्यांशिवाय लोकशाहीची गुणवत्ता टिकविणे कठीण आहे.

शेवटी असे म्हणता येईल की राष्ट्रीय मतदार दिन हा भारतीय लोकशाहीच्या आत्म्याचा उत्सव आहे. मतदार हा केवळ निवडणुकीतील एक घटक नसून तो समाजपरिवर्तनाचा सक्रिय वाहक आहे. विविधतेने भरलेल्या भारतीय समाजात मतदार लोकशाहीला व्यापक, सर्वसमावेशक आणि सजीव बनवतो. राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकाने आपला मताधिकार हा केवळ हक्क नव्हे, तर सामाजिक कर्तव्य म्हणून स्वीकारावा. माहितीपूर्ण, नैतिक, जागरूक आणि जबाबदार मतदार घडविणे हीच सशक्त, स्थिर आणि न्याय्य लोकशाहीची खरी हमी आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)




आपले घर हे आपले विश्रांतीचे, परिवारासोबत एकत्र राहून आनंदाचे क्षण व्यतीत करण्याचे स्थान असते. घरातील वातावरण सकारात्मक असेल, तर त्याचा प्रभाव घरातील मंडळींच्या आरोग्यावर आणि मनस्थितीवरही होत असतो. त्या उलट जर घरातील वातावरण नकारात्मक असेल तर घरामध्ये सतत वाद, कलह, आर्थिक नुकसान, आरोग्यासंबंधी तक्रारी उद्भवू लागतात. त्यामुळे घरातील वातावरण सकारात्मक राहण्यासाठी आणि त्याद्वारे घरातील मंडळींची मनस्थिती प्रसन्न आणि आपापसात सौख्य राहण्यासाठी काही विशेष उपाय वास्तूशास्त्रामध्ये सांगण्यात आले आहेत.वास्तूशास्त्राच्या अनुसार घराच्या मुख्य प्रवेशद्वाराला शक्यतो हलका रंग दिलेला असावा. घराचा मुख्य दरवाजा काळ्या, किंवा गडद राखाडी रंगाचा असू नये. त्याचबरोबर घराच्या प्रवेशद्वारापाशी दिवसा आणि रात्री भरपूर उजेड राहील याची दक्षता घेतली जावी. घरामध्ये राहणाऱ्या मंडळींसाठी किंवा घरामध्ये येणाऱ्या पाहुण्यांसाठी चपला ठेवण्याचे कपाट किंवा स्टँड प्रवेशद्वाराच्या बाहेर, दरवाजाला लागून असू नये. त्याऐवजी हा स्टँड किंवा कपाट मुख्य दरवाजाच्या आतमध्ये एका बाजूला असणे चांगले. घरामध्ये उभ्याने पूजा केली जात असल्यास देवघर जमिनीवर न ठेवता, देवघरामध्ये असणारे देव आपल्या दृष्टीच्या समोर, म्हणजेच ङ्गआय लेव्हलफ्वर असतील अशा रीतीने देवघर मांडले जावे. तसेच हे देवघर शक्यतो लाकडी किंवा संगमरावरी असणे शुभ मानले गेले आहे. देवघर नेहमी पूर्वेला किंवा उत्तर-पूर्वेला असणे चांगले. या दिशांना सकारात्मक उर्जेचे संचरण अधिक असते. घरामध्ये दक्षिण-पूर्व दिशेला लावलेली पणतीची किंवा निरांजनाची ज्योत घरामध्ये सकारात्मक वातावरण आणणारी आहे.घरातील मुख्य बैठकीची खोली पूर्वेला, उत्तरेला, उत्तर-पूर्वेला किंवा दक्षिण-पश्चिम दिशेला असणे चांगले. घरातील टीव्ही, म्युझीक सिस्टम इत्यादी उपकरणे बैठकीच्या खोलीमध्ये दक्षिण-पूर्वी दिशेला असावीत. बैठकीच्या खोलीतील जड फर्निचर, उदाहरणार्थ सोफा, खोलीच्या पश्चिमेला असावा. झोपण्याची खोली घरामध्ये दक्षिण-पश्चिम दिशेला असणे चांगले मानले जाते. बेडरूममध्ये झोपताना आपले डोके पश्चिमेकडे राहील अशा पद्धतीने बेड ठेवलेला असावा. बेडच्या बरोबर समोरच्या भिंतीवर आरसा लावणे टाळावे. त्यामुळे घरामध्ये कलह उत्पन्न होत असल्याचे वास्तूशास्त्र सांगते. जर घराच्या सभोवताली अंगण असेल, तर ते स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी. अंगणामध्ये कुठेही कचरा, सांडपाणी

# अभंगवाणी,विद्यावाचस्पती विद्यानंद

**समचरणदृष्टि विटेवरी साजिरी, तेथे माझी हरि वृत्ति राहो आणिक न लगे मायिक पदार्थ, तेथे माझे आर्त नको देवा ब्रह्मादिक पदे दुःखाची शिराणी, तेथे चित्त झणीं जडो देसी तुका म्हणें त्याचें कळलें आम्हां वर्म, जें जें कर्मधर्म नाशवंत**–संत परंपरेने महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनाला जे सखोल अधिष्ठान दिले, त्यामध्ये संत तुकाराम महाराजांचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या अभंगवाणीमध्ये केवळ भक्तीचा ओलावा नाही; तर जीवनाच्या प्रत्येक पातळीवर मार्गदर्शन करणारे तत्त्वज्ञान दडलेले आहे. तुकाराम महाराजांनी आपल्या अनुभूतीतून जे सांगितले, ते कोणत्याही एका काळापुरते मर्यादित न राहता सर्व काळांसाठी उपयुक्त ठरते. समचरणदृष्टि विटेवरी साजिरी पासून जें जें कर्मधर्म नाशवंत या अभंगओळींपर्यंतचा प्रवास म्हणजे माणसाच्या अंतःकरणातील अज्ञानातून प्रबोधनाकडे नेणारा मार्ग आहे. या अभंगांमध्ये भक्ती, वैराग्य, समता, कर्म, धर्म, अहंकार आणि मुक्ती यांचा परस्परसंबंध अतिशय साध्या, पण आशयघन शब्दांत व्यक्त झाला आहे.

आजच्या धावपळीच्या, स्पर्धात्मक आणि भौतिकतेकडे झुकलेल्या जीवनात माणूस बाह्य यशामागे धावत असताना आतून अधिकाधिक अस्वस्थ होत चालला आहे. अशा वेळी संत तुकाराम महाराजांची वाणी आरशासारखी काम करते. ती आपल्याला विचारायला लावते की आपण नेमके कुठे चाललो आहोत, आपली दृष्टी समतेची आहे की भेदाची, आपली वृत्ती हरिमय आहे की केवळ स्वार्थमय. समाजात वाढत चाललेली असहिष्णुता, अहंकार, पदलालसा आणि संपत्तीची हाव यांची मुळे नेमकी कुठे आहेत, याचे उत्तर या अभंगांमध्ये सूचकपणे सापडते.

अंतर्मुखतेचा मार्ग–या लेखामध्ये निवडलेल्या अभंगओळी केवळ धार्मिक भावनेपुरत्या मर्यादित नाहीत. त्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने जीवनाचा अर्थ उलगडतात, सामाजिक पातळीवर माणूसपणाची जाणीव करून देतात आणि आध्यात्मिक स्तरावर अंतर्मुखतेचा मार्ग दाखवतात. तुकाराम महाराज देवाजवळ काही मागत नाहीत, तर स्वतःतील दोष दूर व्हावेत, चित्त शुद्ध राहावे आणि समतेची दृष्टी लाभावी, अशी प्रार्थना करतात. हीच प्रार्थना प्रत्यक्षात प्रत्येक संवेदनशील माणसाची असायला हवी. म्हणूनच या अभंगांचा सखोल अर्थ उलगडणे म्हणजे केवळ संतसाहित्याचे रसग्रहण नव्हे, तर स्वतःच्या जीवनाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची संधी आहे. संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीमध्ये जीवन, समाज, अध्यात्म आणि तत्त्वज्ञान यांचे अतिशय सखोल, तरीही साध्या भाषेत केलेले चिंतन दिसून येते. समचरणदृष्टि विटेवरी साजिरी या ओळीपासून सुरू होणारा हा अभंगसमूह मानवी जीवनाच्या अंतिम उद्देशाकडे निर्देश करणारा आहे. या अभंगांमध्ये तुकाराम महाराजांनी भक्तीची उंची, वैराग्याची खोली आणि कर्मकांडांच्या क्षणभंगुरतेवर केलेली स्पष्ट टीका अत्यंत प्रभावीपणे मांडलेली आहे.

समचरणदृष्टि विटेवरी साजिरी या ओळीचा अर्थ केवळ डोळ्यांनी विठ्ठलाच्या पायांकडे पाहणे इतकाच मर्यादित नाही. येथे ‘समचरणदृष्टि’ म्हणजे समत्वाची दृष्टी. विटेवरी उभ्या असलेल्या विठ्ठलाचे पाय हे भक्तीसाठी प्रतीक आहेत, पण त्याहूनही अधिक ते समतेचे, स्थैर्याचे आणि निश्चलतेचे प्रतीक आहेत. समाजात माणूस जात, वर्ग, संपत्ती, पद यांवरून भेद निर्माण करतो. तुकाराम महाराज सांगतात की देवाच्या पायांजवळ अशी समदृष्टी सजली पाहिजे, जिथे उच्च-नीच, श्रीमंत-गरीब, ज्ञानी-अज्ञानी असे भेद नष्ट होतात. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने पाहिले तर ही अद्वैताची भूमिका आहे. आत्मा एकच आहे, सर्वांमध्ये तोच परमात्मा वसतो, हे समजल्यावर भेदभाव टिकू शकत नाहीत. सामाजिक दृष्टिकोनातून ही ओळ क्रांतिकारक ठरते, कारण त्या काळातील जातीय विषमता आणि अन्याय यावर ती थेट प्रहार करते. आध्यात्मिक स्तरावर ही ओळ सांगते की ईश्वरप्राप्तीसाठी अहंकार, श्रेष्ठत्वाची भावना आणि द्वेष यांचा त्याग आवश्यक आहे.

कर्मयोगाची संकल्पना

तेथे माझी हरि वृत्ति राहो या ओळीत तुकाराम महाराजांची अंतःकरणातील आर्त इच्छा व्यक्त होते. ‘हरि वृत्ति’ म्हणजे मनाची पूर्णपणे ईश्वरात गुंतलेली अवस्था होय. येथे भक्ती ही केवळ बाह्य पूजा, जप किंवा कर्मकांड नाही, तर अंतःकरणातील अखंड स्मरण आहे. माणूस संसारात राहताना अनेक भूमिका निभावतो; पालक, पती-पत्नी, कर्मचारी, नागरिक; परंतु या सर्व भूमिकांच्या पलीकडे त्याची अंतःवृत्ती जर हरिमय असेल, तरच जीवनाला अर्थ प्राप्त होतो. उदाहरणार्थ, शेतकरी शेतात काम करत असताना, कारागीर आपल्या हातकलेत गुंतलेला असताना किंवा शिक्षक वर्गात अध्यापन करत असताना जर त्याची वृत्ती ईश्वराशी जोडलेली असेल, तर त्याचे कर्म बंधनकारक राहत नाही, तर मुक्तीचा मार्ग बनते. आध्यात्मिक दृष्टीने कर्तव्य करताना आसक्ती न ठेवता, फळाची अपेक्षा न करता ईश्वरस्मरणात रमणे; ही कर्मयोगाचीच संकल्पना आहे.



आणिक न लगे मायिक पदार्थ, तेथे माझे आर्त नको देवा या ओळीत तुकाराम महाराज संसारातील मायिक आकर्षणांपासून मुक्तीची प्रार्थना करतात. ‘मायिक पदार्थ’ म्हणजे संपत्ती, भोग, कीर्ती, सत्ता, इंद्रियसुख यांचा अतिरेक होय. तुकाराम महाराज संसार नाकारत नाहीत, पण त्यातील आसक्ती नाकारतात. कारण आसक्तीमुळेच दुःख, ईर्ष्या, स्पर्धा आणि असमाधान जन्माला येते. सामाजिक स्तरावर पाहिले तर आजही ही ओळ तितकीच लागू पडते. भौतिक प्रगतीच्या शर्यतीत माणूस मानसिक शांतता गमावत चालला आहे.

अधिकाधिक मिळवण्याच्या हव्यासामुळे नाती तुटतात, मूल्ये ढासळतात आणि अंतःकरण रिकामे होते. तुकाराम महाराज म्हणतात की अशा मायिक गोष्टी न लागणार्या अवस्थेत पोहोचल्यावर, देवापुढे केलेले आर्त, म्हणजे मागण्या,अपेक्षा, तक्रारी, यांचीही गरज उरत नाही. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने ही निष्काम भक्ती आहे; जिथे भक्त काहीही मागत नाही, फक्त समर्पण करतो. ब्रह्मादिक पदे दुःखाची शिराणी ही ओळ अत्यंत खोल अर्थ सांगते. ब्रह्मा, विष्णू, महेश यांसारखी सर्वोच्च पदे देखील दुःखाचे मूळ ठरू शकतात, असे तुकाराम महाराज निर्भीडपणे सांगतात.

याचा अर्थ असा की, कोणतेही पद, कितीही उच्च असले, तरी त्यासोबत जबाबदार्या, चिंता आणि बंधने येतात. समाजात माणूस मोठ्या पदावर पोहोचण्यासाठी आयुष्य खर्ची घालतो, पण पद मिळाल्यावर समाधान मिळेलच असे नाही. उलट, भीती, स्पर्धा, टिकवण्याचा ताण वाढतो. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने ही ओळ सांगते की अहंकाराशी जोडलेले कोणतेही स्थान दुःखदायी ठरते. आध्यात्मिक मार्गावरसुद्धा ‘मी मोठा भक्त आहे’, ‘मला विशेष अनुभव आले आहेत’ अशी भावना आली, तर ती साधनेला घातक ठरते. म्हणूनच तुकाराम महाराज पद, अधिकार, मान-सन्मान यांपासून दूर राहण्याचा सल्ला देतात. पुढे तुकाराम महाराज देवाला विनवणी करतात की, अशा दुःखद पदांमध्ये किंवा आकर्षणांमध्ये माझे चित्त अडकू देऊ नकोस. चित्ताची जडणघडण जिथे होते, तिथेच माणसाचे जीवन वळते. आजच्या काळात चित्त सतत बाह्य गोष्टींमध्ये गुंतलेले आहे; मोबाईल, प्रसिद्धी, पैसा, तुलना इत्यादी. तुकाराम महाराज सांगतात की चित्त जर अशा गोष्टींमध्ये अडकले, तर आत्मिक उन्नती शक्य नाही. आध्यात्मिक दृष्टीने चित्तशुद्धी ही मुक्तीची पहिली पायरी आहे. सामाजिक दृष्टीने पाहिले तर सजग, संयमी चित्त असलेला माणूसच समाजासाठी सकारात्मक योगदान देऊ शकतो. अन्यथा अस्थिर मन समाजातही अस्थिरता निर्माण करते. शेवटच्या ओळीत तुकाराम महाराज आपल्या अनुभूतीचे सार सांगतात. कर्म आणि धर्म, म्हणजेच बाह्य आचार, विधी, रूढी हे सर्व नाशवंत आहेत. काळानुसार ते बदलतात, नष्ट होतात. पण सत्य, भक्ती आणि आत्मज्ञान हे शाश्वत आहेत. तुकाराम महाराज कर्माला नाकारत नाहीत, पण कर्मालाच अंतिम सत्य मानण्याचा भ्रम दूर करतात. समाजात अनेकदा कर्मकांडांवरून भेद, संघर्ष आणि अहंकार निर्माण होतो. आध्यात्मिक दृष्टीने पाहिले तर केवळ कर्म केल्याने मुक्ती मिळत नाही, तर त्यामागील भाव महत्त्वाचा असतो. उदाहरणार्थ, दान केले; पण अहंकार वाढला, तर ते कर्म बंधनकारक ठरते. पण छोट्या सेवेच्या कृतीतही जर समर्पण असेल, तर ती मुक्तीचा मार्ग बनते.

या सर्व अभंगांचा एकत्रित विचार केला तर तुकाराम महाराज मानवाला अंतर्मुख होण्याचे आवाहन करतात. समतेची दृष्टी, हरिमय वृत्ती, मायिक आसक्तीचा त्याग, पद-अहंकारापासून दूर राहणे, चित्ताची शुद्धता आणि कर्मधर्मांच्या क्षणभंगुरतेची जाणीव; या सर्व गोष्टी एकत्र आल्यावरच खरे आध्यात्मिक जीवन साकार होते. समाजासाठी हा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण तो माणसाला माणसाशी जोडतो, भेदाभेद विसरायला शिकवतो आणि अंतःकरणातील शांततेकडे नेतो. तुकाराम महाराजांची ही वाणी केवळ भक्तांसाठी नाही, तर चिंतनशील, सजग आणि संवेदनशील समाज घडवण्यासाठी आजही तितकीच मार्गदर्शक आहे.

समानतेची वृत्ती–संत तुकाराम महाराजांच्या या अभंगविचारांचे सार लक्षात घेतले, तर एक गोष्ट स्पष्टपणे समोर येते की त्यांनी जीवनाकडे पलायनवादी दृष्टीने पाहिले नाही. संसारात राहूनही संसाराच्या बंधनांपासून मुक्त कसे होता येते, हे त्यांनी आपल्या अनुभवातून दाखवून दिले. समचरणदृष्टी म्हणजे केवळ देवासमोर नम्र होणे नव्हे, तर माणसामाणसांमध्ये समानता पाहण्याची वृत्ती अंगीकारणे होय. हरि वृत्ती म्हणजे बाह्य पूजा नसून अंतःकरणातील सातत्यपूर्ण जागरूकता आहे. मायिक पदार्थांपासून दूर राहण्याचा अर्थ सर्व गोष्टी सोडून देणे नाही, तर त्यांच्याशी असलेली आसक्ती सोडणे आहे. तुकाराम महाराज पद, अधिकार आणि मोठेपणाच्या मोहापासून सावध करतात, कारण कितीही उच्च पद मिळाले, तरी अहंकार टिकून राहिला, तर दुःख अटळ आहे. चित्त जिथे गुंतते, तिथेच माणूस अडकतो, हे त्यांनी अत्यंत नेमकेपणाने सांगितले आहे. त्यामुळे चित्तशुद्धी, संयम आणि विवेक यांना त्यांनी सर्वोच्च महत्त्व दिले. कर्मधर्म नाशवंत आहेत, हे सांगताना ते कर्म नाकारत नाहीत, तर कर्माच्या आहारी जाण्यापासून माणसाला वाचवतात. भावशुद्धीशिवाय कोणतेही कर्म मुक्ती देऊ शकत नाही, हा त्यांचा ठाम निष्कर्ष आहे.

आजच्या समाजाने या अभंगांचा अर्थ केवळ धार्मिक ग्रंथातील ओळी म्हणून न पाहता, जीवनव्यवहारातील दिशा म्हणून स्वीकारला, तर अनेक प्रश्न सुटू शकतात. सामाजिक ताणतणाव कमी होऊ शकतात, माणसांमधील भेदाभेद निवळू शकतात आणि व्यक्तीच्या मनात स्थैर्य निर्माण होऊ शकते. तुकाराम महाराजांची वाणी आपल्याला अंतर्मुख होण्यास भाग पाडते, स्वतःच्या अहंकाराकडे पाहायला शिकवते आणि शाश्वत मूल्यांकडे नेते.अशा अर्थाने हे अभंग केवळ भक्तीचे गीत नाहीत, तर जीवनाचे तत्त्वज्ञान आहेत. ते वाचकाला देवाकडेच नव्हे, तर स्वतःकडेही पाहायला शिकवतात. समतेची दृष्टी, शुद्ध चित्त आणि निःस्वार्थ वृत्ती यांचा संगम म्हणजेच तुकाराम महाराजांचा खरा संदेश आहे. हा संदेश समजून घेतला, आचरणात आणला, तर व्यक्ती, समाज आणि संपूर्ण मानवतेच्या जीवनात अर्थपूर्ण परिवर्तन घडू शकते.

## Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



**पौरुषत्व वाढवण्यासाठी खा हे १० पदार्थ**

संतुलित आहार आरोग्यासाठीच नव्हे तर प्रजनन क्षमता वाढविण्यासाठीही आवश्यक आहे. शरीरात टेस्टोस्टेरॉनचे स्तर कमी झाल्याने सेक्स लाईफवर वाईट परिणाम होतो. यासाठी योग्य आहार घेणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त ताण न घेणे आणि अधिक गोड व तळकट पदार्थ खाणे टाळावे. तर चला सांगू पौरुषत्व वाढवण्यासाठी कोणते १० पदार्थ आहारा सामील केले पाहिजे. ● **सुखे मेवे**–ड्राय फ्रूट्समध्ये जिंक आढळतं तसेच ब्राझील नट्सही खाणे फायदेशीर ठरेल.

## २ Joke विनोद




**बंडू शाळेतून धावतच घरी आला आणि आईला म्हणाला, ङ्गआई, आज वर्गात शिक्षकांच्या प्रश्नाला माझ्याशिवाय कुणीच उत्तर देऊ शकलं नाही! आईने विचारले, अरे वा. प्रश्न काय होता.फ शिक्षकांच्या टेबलाचा पाय कोणी मोडला!**

## ३ Message संदेश



Doctor: dekhiye, yeh bimaari khaandaani hai. aapke daadaaji se shuru hui hai.
Patient: bach gaya!!! tab aap yeh operation mere daadaaji ko hee keejiye.

## ४ Thought सुविचार



चूक ही चिवट वनस्पती आहे, ती वाटेल त्या भूमीत फोफावते.

– मार्टिन रूपर

**संस्कृत सुभाषित**

अतो हास्यतरं लोके किंचिदन्यन्न विद्यते
यत्र दुर्जनमित्याह, दुर्जनः सज्जनं स्वयम्।।
(आदिपर्व, अध्याय ७४, ोक ९५ महाभारत)

अर्थ :स्वत: दुर्जन असणाऱ्याने सज्जनालाच दुर्जन म्हणावे, यापेक्षा हास्यास्पद गोष्ट दुसरी कुठलीच नसेल

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. बारमाही फुलणारे फूल
४. हवामान, स्थिती
७. चंद्र
११. दयाळू
१३. निकृष्ट दर्जाचे
१४. एकरूपता
१५. च्या सह
१७. वास्तुभोवतीचा परिसर
१८. आदर, सन्मान
१९. भादुरी पण जया नव्हे!
२०. वाहून नेणारा
२२. लहान
२३. पक्ष, बाजू
२५. अंधार
२६. दार, कवाड
२८. लोक, प्रजा
२९. मनाला टोचणारे दुःख
३०. हे माणसाला नादान बनवते?
३१. लाडवाला घडवणारा किंवा बिघडवणारा!
३२. जेव्हा
३३. राग अणणारे (कृत्य)
३५. ही गहाण ठेवून काय होणार!
३६. मारला गेलेला
३७. आयुष्यभर
३८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
३९. ललाट
४१. प्राण, जीव (हिंदी)
४२. आणि
४३. शिक्षा
४५. सोंग वठवणारा
४७. फाडलेल्या दुधाच्या वड्या
४८. आई
५०. राजाचा निरोप्या, वकील इ.
५२. सोन्याचा कस
५३. नाद, छंद, सरावाने घडणारी गोष्ट
५४. खबदाड
५५. मंगळवारची चतुर्थी
५७. रोड, अशक्त
६०. घर
६२. अटीची भाषा
६३. आंदोलन, लढा
६४. महात्मा गांधीजींचे अखेरचे शब्द
६५. बाळाच्या अंगावरची तेलहळदीने जाते
६६. थरथर
६७. गाभाऱ्यात तेवणारी
६८. कोणाचा खालच्या पट्टीतला कोणाचा वरच्या
६९. ऱ्हास
७१. दशानन
७२. हिंदीत रहस्य
७३. गाढव
७४. ऐट, दिमाख
७७. वाणी, बोलणे
७९. मधुमक्षिका
८१. प्रश्न
८२. एखादे काम करण्यास समर्थ
८३. अतिशय वेदना

### उभे शब्द

१. पातळसर
२. मोफत
३. नम्र, वाकलेला
४. रेती
५. राबता, पायंडा
६. फलंदाजाऐवजी धावपळ करणारा
७. फूल, पुष्प
८. पात्याची तीक्ष्णता
९. सत्त्व
१०. उपवासाला चालणारा कंद
१२. बातमीदार
१४. सम, सारखा
१६. खेळातून हद्दपार
२०. वाद्यवृंदातील कलाकार
२१. सैन्याची परेड
२२. छोटा
२३. केस काळे करणारा
२४. जन्मदाते
२७. जास्त
२८. होडी, जहाज इ.
२९. एक तारवाद्य
३०. राक्षस
३१. शिक्षणव्यवस्थेच्या त्रिकोणापैकी विद्यार्थी-शिक्षकांबरोबरचा तिसरा
३३. शक्यता असलेले
३४. ज्या प्रमाणे
३५. अमावस्या
३६. दुष्ट, नीच
३७. सहस्त्र
४०. पर्ण
४४. जादू करणारा
४६. भ्रष्टाचार
४७. वारा, मरूत
४८. टोकिओ या देशाची राजधानी
४९. पुरुष
५१. शहाणा, हुशार
५४. पाऊल (हिंदी)
५५. हनुमानाची माता
५६. पोपट
५८. वेदना, खटका
५९. डावरा
६०. निष्णात, वाकबगार
६१. चीजवस्तू
६४. सुवर्ण
६५. नुसताच शोभेचा फौजफाटा
६७. उत्सवाचे दिवस
६८. पूजा, प्रार्थना इ.
६९. उद्यानंतरचा दिवस
७०. धुंदी, कैफ
७३. वाळा
७५. शरीरातील नाडी
७६. कौसल्यापुत्र
७८. चक्र
७९. अभिप्राय
८०. अब्रू

### आडवे उत्तर

१.सदाफुली ४.वातारण ७.सुधाकर ११.कनवाळू १३.हीन १४.समरसता १५.सकट १७.आवार १८.मान १९.रीटा २०.वाहक २२.सान २३.कड २५.तम २६.दरवाजा २८.जन २९.सल ३०.दान ३१.पाक ३२.यदा ३३.संतापजनक ३५.अक्कल ३६.हत ३७.हयातभर ३८.सावज ३९.कपाल ४१.जान ४२.व ४३.सजा ४५.नकलाकार ४७.पनीर ४८.जननी ५०.दूत ५२.टच ५३.सवय ५४.कपार ५५.अंगारकी ५७.लुकडा ६०.सदन ६२.जरतर ६३.चळवळ ६४.हे राम ६५.लव ६६.कंप ६७.समई ६८.आवाज ६९.पतन ७१.रावण ७२.राज ७३.खर ७४.शान ७७.वाचा ७९.मधमाशी ८१.सवाल ८२.सक्षम ८३.नरकयातना

### उभे उत्तर

१.सरसरीत २.फुकट ३.लीन ४.वाळू ५.वहिवाट ६.रनर ७.सुमन ८.धार ९.कस १०.रताळे १२.वार्ताहर १४.समान १६.कटाप २०.वादक २१.कवायत २२.सान २३.कलप २४.जनकजननी २७.जादा २८.जलयान २९.सतार ३०.दानव ३१.पालक ३३.संभवनीय ३४.जसा ३५.अवस ३६.हलकट ३७.हजार ४०.पान ४४.जादूगार ४६.लाचलुचपत ४७.पवन ४८.जपान ४९.नर ५१.तरतरीत ५४.कदम ५५.अंजनी ५६.कीर ५८.कळ ५९.डावखेरा ६०.सराईत ६१.ऐवज ६४.हेम ६५.लवाजमा ६७.सणवार ६८.आराधना ६९.परवा ७०.नशा ७३.खस ७५.नस ७६.राम ७८.चाक ७९.मत ८०.शील



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त



### सरफराज खानचे द्विशतक

मुंबई : मुंबई संघाच्या मध्यफळीचा कणा सरफराज खान याने रणजी ट्रॉफी स्पर्धेतील दमदार द्विशतक झळकावले आहे. हैदराबाद विरुद्धच्या सामन्यात पहिल्या दिवशीच्या खेळात शतकाला गवसणी घातल्यावर दुसरा दिवस त्याने द्विशतकासह गाजवला. या खेळीसह त्याने खास विक्रमालाही गवसणी घातली आहे. त्याच्या द्विशतकाच्या जोरावर मुंबईच्या संघाने हैदराबादसमोर ८ बाद ५३३ धावांचा डोंगर उभारल्याचे पाहायला मिळाले. हैदराबादविरुद्धच्या सामन्यात सरफराज खानने २०६ चेंडूंत द्विशतक पूर्ण केले. २१९ चेंडूंत त्याने ९ षटकार आणि १९ चौकारांच्या मदतीने २२७ धावा केल्या. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याच्या बॅटमधून आलेले हे सहावे द्विशतक ठरले. पहिल्या दिवसाअखेर तो १४२ धावांवर नाबाद होता. ही खेळी आणखी मोठी करत त्याने खास डाव साधला.

मुंबईचा हा स्टार फलंदाज अवघ्या ५० दिवसांच्या आत देशांतर्गत क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये शतक झळकावण्यात यशस्वी ठरला आहे. २ डिसेंबर रोजी त्याने सैयद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत आसामविरुद्धच्या सामन्यात अवघ्या ४७ चेंडूत शतक झळकावले होते. ३१ डिसेंबरला विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत गोव्याविरुद्ध त्याने ७५ चेंडूंत १५७ धावांची धमाकेदार खेळी केल्याचे पाहायला मिळाले होते. त्यात आता रणजी ट्रॉफी स्पर्धेतील कडक द्विशतकाची भर पडली आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्यपूर्ण कामगिरीसह त्याने पुन्हा एकदा बीसीसीआय निवडकर्त्यांना आपल्यातील धमक दाखवली आहे. नव्या वर्षात पुन्हा त्याला टीम इंडियात एन्ट्री मिळणार का? ते पाहण्याजोगे असेल. राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये द्विशतकी षटकार मारण्याआधी त्याने ५००० धावांचा पल्लाही गाठला होता. आतापर्यंत त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ६४.३ च्या सरासरी आणि ७०.१० च्या स्ट्राइक रेटनं ६१ सामन्यातील ९१ डावात ५०९० धावा काढल्या आहेत.



### तिसर्या टप्प्यात कॅमेरून स्कॉटची सरशी

पुणे : 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' चा तिसरा टप्पा आतापर्यंतचा सर्वात आव्हानात्मक ठरला. पश्चिम घाटाच्या प्रवेशद्वारावर सायकलस्वारांच्या कौशल्याची आणि सहनशक्तीची मोठी परीक्षा पाहायला मिळाली. शर्यतीच्या या आव्हानात्मक तिसर्या टप्प्यात चीनच्या 'ली निंग स्टार' संघाचा कॅमेरून निकोलस स्कॉट याने बाजी मारली. त्याने १३७ किलोमीटरच्या हा टप्पा ३ तास ४ मिनिटे आणि १३ सेकंदांत पार केला. अर्थात, क्रमवारीत अव्वल क्रमांक कायम राखून ल्यूक मुडग्वे याने 'यलो जर्सी'वरील वर्चस्व कायम राखले आहे. सासवड नगर परिषदेच्या चंदन टेकडी येथून दुपारी १२:३० वाजता या टप्प्याला सुरुवात झाली. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी हिरवा झेंडा दाखवून या शर्यतीचा शुभारंभ केला. या वेळी राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार, आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप, नगराध्यक्ष आनंदी जगताप, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे सचिव संजय शेटे आदी उपस्थित होते. 'भारत माता की जय', 'जय भवानी जय शिवाजी', 'गणपती बाप्पा मोरया' अशा घोषणांनी शाळेच्या मुलांनी आणि उपस्थित नागरिकांनी परिसर दणाणून सोडला.यानंतर सायकलपटूंनी बारामतीच्या दिशेने कूच केले आणि विद्या प्रतिष्ठानच्या पेन्सिल चौक येथील फिनिश लाईनच्या जवळ आले, तेव्हा शर्यत अधिक तीव्र झाली.

# आयसीसीचा बांगलादेशला दणका

## टी-२० विश्वचषकातून पत्ता कट, स्कॉटलंडचा प्रवेश

मुंबई : आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने अखेर बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या आडमुठ्या भूमिकेवर कठोर कारवाई केली आहे. भारतात होणाऱ्या आगामी टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये खेळण्यास सुरक्षेचे कारण देत नकार देणाऱ्या बांगलादेश संघाला आयसीसीने स्पर्धेतून अधिकृतरित्या बाहेर काढले आहे. बांगलादेशच्या जागी आता स्कॉटलंडचा संघ स्पर्धेत सहभागी होणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने भारतातील सुरक्षेचे कारण देत विश्वचषकाचे सामने दुसऱ्या देशात हलवण्याची मागणी केली होती. ही मागणी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने फेटाळून लावली. आयसीसीने एक स्वतंत्र सुरक्षा समिती नेमली होती ज्याने भारतातील सुरक्षेचा आढावा घेतला आणि धोके नसल्याचे स्पष्ट केले होते. असे असूनही बांगलादेशने आपल्या भूमिकेवर ठाम राहत सहभाग निश्चित केला नाही. बांगलादेशच्या सहभागाबाबत कोणताही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने, आयसीसीने त्यांना स्पर्धेतून बाहेर काढण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाची माहिती आयसीसीने बीसीबीला पत्राद्वारे दिली. स्पर्धेचे स्वरूप आणि वेळापत्रक



कायम ठेवण्यासाठी तातडीने स्कॉटलंड संघाचा विश्वचषकात समावेश करण्यात आला आहे. स्कॉटलंडला 'ग्रुप सी' मध्ये स्थान मिळाले असून, त्यांचे सामने आता इंग्लंड, वेस्ट इंडीज, नेपाळ आणि इटली या संघांशी होणार आहेत.

आयसीसीच्या या निर्णयामुळे क्रिकेट विश्वात चर्चा सुरू झाली आहे. सुरक्षेचे कारण देत स्पर्धेतून माघार घेण्याच्या बांगलादेशच्या भूमिकेवर अनेक क्रिकेट चाहते आणि तज्ज्ञांकडून टीका होत आहे. आयसीसीने घेतलेल्या या कठोर निर्णयामुळे भविष्यात अशा परिस्थितीला कसे सामोरे जावे यासाठी एक उदाहरण समोर आले आहे. का मिळाली स्कॉटलंडला संधी? स्कॉटलंड सध्या टी-२० क्रिकेट क्रमवारीत १४ व्या क्रमांकावर आहेत. त्यांच्यावर असलेले तेराही संघांनी टी२० वर्ल्ड कप २०२६ साठी पात्रता मिळवली आहे. त्यामुळे बाकी संघांच्या उत्तम क्रमवारीमुळे त्यांना पसंती देण्यात आली आहे. पण त्यासोबतच त्यांची गेल्या काही वर्षातील आयसीसी स्पर्धेतील कामगिरीही लक्षात घेण्यात आली आहे. त्यांनी २०२४ टी-२० वर्ल्डकपमध्ये ग्रुप बीमध्ये तिसऱ्या क्रमांकावर होते. त्यांचे आणि इंग्लंडचे गुण सारखे होते, पण इंग्लंडचा नेट रन रेट चांगला असल्याने त्यांनी पुढच्या फेरीत प्रवेश केला होता. २०२२ टी२० वर्ल्ड कप स्पर्धेतही त्यांनी वेस्ट इंडिजला पराभूत केले होते. २०२१ टी२० वर्ल्ड कपमध्ये स्कॉटलंडने बांगलादेशला पराभूत केले होते. दरम्यान, स्कॉटलंड टी-२० वर्ल्ड कप २०२६ साठी झालेल्या युरोपियन क्वालिफायर्समध्ये चौथ्या क्रमांकावर राहिल्याने त्यांना आधी पात्रता मिळाली नव्हती. मात्र आता ते बांगलादेशच्या जागेवर खेळू शकतात.

# गुवाहाटीत आज भारत विरुद्ध न्यूझीलंड लढत, भारताला मालिका जिंकण्याची संधी

गुवाहाटी : भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील तिसरा महत्त्वपूर्ण सामना रविवारी गुवाहाटी येथील एसीसी बरसापारा स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. पहिल्या दोन्ही सामन्यात दिमाखदार विजय मिळवून भारताने मालिकेत २-० अशी भक्कम आघाडी घेतली असून, आजचा सामना जिंकून मालिका खिशात घालण्यासाठी सूर्यकुमार यादवचा संघ सज्ज झाला आहे. भारतीय संघ सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. इशान किशनचे स्फोटक पुनरागमन आणि सूर्यकुमार यादवची फटकेबाजी न्यूझीलंडच्या गोलंदाजांसाठी डोकेदुखी ठरत आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात इशान किशनने केलेल्या धमाकेदार पुनरागमनामुळे संघातील सलामीवीराच्या जागेसाठी चुरस निर्माण झाली आहे. एकीकडे इशानने आपली दावेदारी मजबूत केली आहे, तर दुसरीकडे संजू सॅमसनचा खराब फॉर्म कायम आहे.



आजच्या सामन्यात विजय मिळवल्यास भारत दोन सामने शिल्लक असतानाच मालिका खिशात घालेल, ज्यामुळे आगामी टी-२० विश्वचषकापूर्वी संघाचा आत्मविश्वास द्विगुणित होईल. दुसरीकडे, पाहुण्या न्यूझीलंड संघासाठी हा सामना अस्तित्वाची लढाई आहे. मालिकेतील आव्हान जिवंत ठेवण्यासाठी त्यांना कोणत्याही परिस्थितीत विजय मिळवावाच लागेल. किवी फलंदाजांना भारताच्या वेगवान आणि फिरकी गोलंदाजीचा सामना करण्यासाठी विशेष रणनीती आखावी लागणार आहे. गुवाहाटीचे बरसापारा मैदान हे फलंदाजांसाठी नंदनवन मानले जाते. येथील खेळपट्टीवर धावांचा पाऊस पडण्याची शक्यता असून, २०० हून अधिक धावांचे लक्ष्य गाठले जाऊ शकते. रात्रीच्या वेळी पडणारे दव महत्त्वाचे ठरणार असल्याने नाणेफेक जिंकणारा संघ प्रथम गोलंदाजी स्वीकारण्याची शक्यता अधिक आहे.

**भारतीय संघाचे नियोजन**

सलामीची जोडी: संजू सॅमसनच्या खराब फॉर्ममुळे त्याच्यावर टांगती तलवार आहे. तरीही, मालिका अद्याप जिंकलेली नसल्याने संघ व्यवस्थापन त्याला शेवटची संधी देऊ शकते किंवा इशान किशनला सलामीला बढती देऊन मधल्या फळीत बदल करू शकते.

आक्रमक पवित्रा: इशान किशन आणि सूर्यकुमार यादव यांचा फॉर्म पाहता भारत सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करून न्यूझीलंडला बॅकफूटवर ठेवण्याचे नियोजन करेल.



# मुंबईत कुस्तीची महादंगल!

## चार राज्यातले दिग्गज पैलवान भिडणार

मुंबई : पहिल्यांदाच देशातील चार बलाढ्य कुस्ती राज्यांमधील अव्वल पैलवान एकाच मैदानात आमनेसामने येणार असून, हा थरारक महासंग्राम 'कुस्ती महादंगल २०२६' च्या रूपाने साजरा होणार आहे.

अर्जुन पुरस्कार विजेते, ऑलिम्पियन आणि सध्या मुंबई पोलीस दलात उपायुक्त पदावर कार्यरत असलेले नरसिंह यादव यांच्या संकल्पनेतून, नरसिंह फाऊंडेशन आणि नागरिक संरक्षण दल यांच्या संयुक्त विद्यमाने ही भव्य एकदिवसीय कुस्ती स्पर्धा २६ जानेवारीला दुपारी २ ते सायंकाळी ७ या वेळेत विलासराव देशमुख मैदान, लोखंडवाला, कांदिवली (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.या स्पर्धेत महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पंजाब ही देशातील कुस्तीची बलाढ्य राज्ये सहभागी होत असून प्रत्येक संघातून ५ पुरुष आणि २ महिला असे एकूण ७ पैलवान आपले कसब पणाला लावणार आहेत. विजेत्यांसाठी आकर्षक रोख बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे.

या ऐतिहासिक स्पर्धेला केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, मंत्री गिरीश महाजन, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, आमदार अतुल भातखळकर, आशिष शेलार आणि संजय उपाध्याय यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभणार आहे. यावेळी हिंदकेसरी, महाराष्ट्र केसरी तसेच जागतिक स्तरावर चमकलेल्या कुस्तीपटूंचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

चार राज्यांची संघ पुढीलप्रमाणे :मराठा वॉरियर्स (महाराष्ट्र) : पृथ्वीराज पाटील (महाराष्ट्र केसरी, वर्ल्ड मेडलिस्ट), रविराज चव्हाण, आदर्श पाटील, सोनबा गोंगाणे, अक्षय ढेरे. महिला : अमृता पुजारी, सोनाली महाडिक शेर-ए-पंजाब (पंजाब): करणदीप (पंजाब केसरी), संदीप माने, रोहित प्रजापत, उदय शर्मा, अभिषेक यादव. महिला : प्रियंका सिकरवार, शिवानी

हरियाणा शूर (हरियाणा): अंकुश, अमित, निवान, आकाश, सागर. महिला : कुसुम दहिया, मोनी गुर्जर.यूपी योद्धा (उत्तर प्रदेश): अभिनायक सिंह (यूपी केसरी), मुलायम यादव, तेजवीर यादव, आयुष चौधरी, विशाल सहानी. महिला : प्रियंका सिकरवार, फ्रीडम यादव.

# ऑस्ट्रेलियन ओपनच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश

मेलबर्न : टेनिस जगतातील महान खेळाडूंपैकी एक असलेल्या नोव्हाक जोकोविचने ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये आणखी एका ऐतिहासिक कामगिरीच्या दिशेने पाऊल टाकले आहे. त्याने इटालियन क्वालिफायर फ्रांसेस्को मास्ट्रेलीचा सरळ सेटमध्ये पराभव करत स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. हा जोकोविचच्या कारकिर्दीतील ३९९वा ग्रँड स्लॅम सामना विजय होता, ज्यामुळे तो आता ४०० ग्रँड स्लॅम एकेरी सामने जिंकणारा पहिला खेळाडू बनण्याच्या अगदी जवळ आहे. गुरुवारी रॉड लेव्हर एरिना येथे झालेल्या सामन्यात, ३८ वर्षीय जोकोविचने सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. त्याने मास्ट्रेलीचा ६-३, ६-२, ६-२ असा सहज पराभव केला. हा त्याचा ऑस्ट्रेलियन ओपनमधील १०१वा विजय होता, ज्यामुळे त्याने रॉजर फेडररच्या मेलबर्नमधील विक्रमाशी बरोबरी केली आहे. जोकोविचने आपल्या पहिल्या सर्व्हिसवर ८७% गुण जिंकले आणि मास्ट्रेलीला सामन्यादरम्यान केवळ एकदाच ब्रेकपॉईंट घेता आला. आता सर्वांचे लक्ष जोकोविचच्या पुढील सामन्यावर लागले आहे, जिथे तो आपला ४००वा विजय नोंदवण्याचा प्रयत्न करेल. तिसऱ्या फेरीत त्याचा सामना डच खेळाडू बोटिक व्हॅन मुख्य सांख्यिकी आणि विक्रम १ ग्रँड स्लॅम एकेरी विजेतेपदे : २४ (पुरुषांमध्ये सर्वाधिक). २ एटीपी टूर एकेरी विजेतेपदे : १०१. ३ जगभरातील क्रमांक १ रँकिंग : एकूण ४२८ आठवडे (पुरुष आणि महिला टेनिसमध्ये सर्वाधिक). ४ वर्षाच्या शेवटी क्रमांक १ रँकिंग : ८ वेळा (विक्रम). ५ विन-लॉस रेकॉर्ड (एकेरी) : ११६३ विजय आणि २३३ पराभव (८३% जिंकण्याचे प्रमाण). ६ प्राइझ मनी : १९१ दशलक्ष पेक्षा जास्त (इतिहासातील सर्वाधिक). ग्रँड स्लॅम कामगिरी जोकोविचने प्रत्येक ग्रँड स्लॅम स्पर्धेत किमान १०० सामने जिंकणारे पहिले खेळाडू बनण्याचा विक्रम केला आहे. १ ऑस्ट्रेलियन ओपन : १० विजेतेपदे (विक्रम). २ फ्रेंच ओपन (रोलँड गॅरोस) : ३ विजेतेपदे. ३ विम्बल्डन : ७ विजेतेपदे. ४ यूएस ओपन : ४

# भारताची बॅडमिंटनपटू सिंधूची ऐतिहासिक

जकार्ता : भारताची स्टार महिला बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू सध्या इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत खेळत आहे. या स्पर्धेतील प्री-क्वार्टर फायनल सामन्यात डेन्मार्कच्या लाइन होजमार्क कजेरफेल्ड हिला सरळ सेटमध्ये पराभूत करत सिंधूनं पुढच्या फेरीत प्रवेश केला. या विजासह तिने नवा इतिहास रचला आहे. इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत पी. व्ही. सिंधूची सुरुवात संघर्षपूर्ण राहिली. पहिला सामना जिंकण्यासाठी तिला चांगलीच मेहनत घ्यावी लागली होती. मात्र प्री-क्वार्टर फायनलमध्ये मिळालेला हा विजय सिंधूसाठी ऐतिहासिक ठरला. जे फुलराणी सायना नेहवाल हिला जमलं नाही ते पीव्ही सिंधूनं करून दाखवलं आहे.

# ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटीसाठी भारतीय संघाची घोषणा

**मुंबई** : महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धा संपल्यानंतर भारतीय महिला संघ पुढच्या महिन्यात ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यात वन-डे, टी-२० आणि कसोटी सामने खेळणार आहे. २०२५ वनडे वर्ल्ड कप विजयानंतर भारतीय संघाचा हा पहिला परदेशी दौरा आहे. या दौऱ्यातील वन-डे आणि टी-२० मालिकेसाठी यापूर्वीच संघांची घोषणा करण्यात आली आहे. पण या संघात एक बदल झाला आहे. तसेच एकमेव कसोटी सामन्यासाठीही भारतीय महिला संघाची घोषणा शनिवारी करण्यात आली आहे. या कसोटी संघाव्यतिरिक्त, बीसीसीआयने एसीसी राइजिंग स्टार्स आशिया कपसाठी इंडिया 'ए' संघाची देखील घोषणा केली आहे. १५ फेब्रुवारीपासून टी-२० मालिकेने भारताच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्याला सुरुवात होणार आहे. त्यानंतर ६ ते ९ मार्च रोजी पर्थमध्ये होणाऱ्या दिवस-रात्र कसोटी सामन्याने या दौऱ्याचा शेवट होईल. भारताच्या कसोटी संघाचे नेतृत्व हरमनप्रीत कौर सांभाळणार असून स्मृती मानधना उपकर्णधार असेल. याशिवाय कसोटी संघात शफाली वर्मा, जेमिमाह रोड्रिग्स, दीप्ती शर्मा या अनुभवी खेळाडूंचाही समावेश आहे. याशिवाय २०२५ वर्ल्ड कपदरम्यान दुखापतग्रस्त झालेली प्रतिका रावलचाही कसोटी संघात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे ती या दौऱ्यातून भारतीय संघात पुनरागमन करू शकते. वनडे टी-२० संघात बदल : ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील भारतीय महिला संघाची वनडे आणि टी२० मालिकांसाठी आधीच निवड झाली आहे. मात्र, यष्टीरक्षक फलंदाज गुनालन कमालिनी ही वूमन्स प्रीमयर लीग दरम्यान दुखापतग्रस्त झाल्याने या संपूर्ण दौऱ्यातूनच बाहेर झाली आहे. त्यामुळे भारताच्या वनडे आणि टी२० संघात तिच्या जागेवर उमा छेत्रीला संधी देण्यात आली आहे. एलिसा हेलीचा शेवटचा सामना : पर्थमध्ये होणारा दिवस-रात्र कसोटी सामना एलिसा



हिली हिच्यासाठी शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना आहे. ती या सामन्यानंतर क्रिकेटमधून निवृत्त होणार आहे. कसोटी संघ - हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), शफाली वर्मा, जेमिमाह रॉड्रिग्स, अमनजोत कौर, ऋचा घोष (यष्टीरक्षक), उमा चेत्री (यष्टीरक्षक), प्रतिका रावल, हर्लिन देओल, दीप्ती शर्मा, रेणुका सिंग ठाकूर, स्नेह राणा, क्रांती गौड, वैष्णवी शर्मा, सायली सातघरे. वनडे संघ - हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), शफाली वर्मा, रेणुका ठाकूर, श्री चरणी, वैष्णवी शर्मा, क्रांती गौड, स्नेह राणा, दीप्ती शर्मा, ऋचा घोष (यष्टीरक्षक), उमा छेत्री (यष्टीरक्षक), काशवी गौतम, अमनजोत कौर, जेमिमाह रॉड्रीक्स, हर्लिन देओल. टी २० संघ - हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधा), शफाली वर्मा, रेणुका ठाकूर, श्री चरणी, वैष्णवी शर्मा, क्रांती गौड, स्नेह राणा, दीप्ती शर्मा, रिचा घोष (यष्टीरक्षक), उमा छेत्री (यष्टीरक्षक), अरुंधती रेड्डी, अमनजोत कौर, जेमिमाह रॉड्रिक्स, भारती फुलमाली, श्रेयंका पाटील. इंडिया 'ए' (एसीसी राइजिंग स्टार्स आशिया कप) संघ: हुमैरा काझी, वृंदा दिनेश, अनुष्का शर्मा, दिया यादव, तेजल हसाब्नीस, नंदिनी कश्यप (यष्टिरक्षक), ममता एम (यष्टिरक्षक), सोनिया मेंढिया, मिन्नू मणी, तनुजा कंवर, प्रेमा रावत, सायमा ठाकर, जिंतिमणी कलिता, नंदिनी शर्मा.

भारतीय महिला संघाचा ऑस्ट्रेलिया दौरा २०२६

टी-२० मालिका १५ फेब्रुवारी - पहिला टी२० सामना, सिडनी (दु. १.३० वाजता) १९ फेब्रुवारी - दुसरा टी२० सामना, कॅनबरा (दु. १.३० वाजता) २१ फेब्रुवारी - तिसरा टी२० सामना, ॲडलेड, (दु. २.०० वाजता) वन-डे मालिका २४ फेब्रुवारी - पहिला वनडे सामना, ब्रिस्बेन (स. ९.०० वाजता) २७ फेब्रुवारी - दुसरा वनडे सामना, होबार्ट (स. ९.०० वाजता) १ मार्च - तिसरा वनडे सामना, होबार्ट (स. ९.०० वाजता) कसोटी सामना ६ ते ९ मार्च - दिवस-रात्र कसोटी सामना (स. ११ वाजता)

# शीख धर्माचा महाराष्ट्राशी अनुबंध

महाराष्ट्र आणि शीख धर्म यांचा अनुबंध हा दोन महान संस्कृतींच्या आत्मिक एकात्मतेचा प्रवास आहे. दक्षिणेतील नांदेड हे शांत शहर गुरु गोविंद सिंगजींच्या पदस्पर्शाने पावन झाले आणि 'हजूर साहिब' या नावाने खालसा पंथाच्या पाच तख्तांपैकी एक प्रमुख धार्मिक केंद्र बनले.गुरु गोविंद सिंगजींनी याच मातीत 'गुरु ग्रंथ साहिब' या पवित्र ग्रंथाला 'अंतिम आणि जिवंत गुरु' म्हणून घोषित केले. मात्र, या ऐतिहासिक क्षणाचे बीजारोपण कित्येक शतकांपूर्वी महाराष्ट्राच्या संतांनी आणि शीख गुरूंनी एकमेकांशी साधलेल्या संवादातून झाले होते.

संत नामदेव: पंजाबच्या भूमीत पेरलेले भागवत धर्माचे बीज

महाराष्ट्र आणि पंजाब या दोन टोकांच्या राज्यांना जोडणारा पहिला



आणि सर्वात भक्कम दुवा म्हणजे 'संत नामदेव'. १३ व्या शतकात जेव्हा दळणवळणाची साधने नव्हती, तेव्हा विठ्ठल भक्त नामदेवांनी महाराष्ट्रातील भागवत धर्माची पताका थेट पंजाबपर्यंत नेली. संत नामदेवांनी आपल्या आयुष्यातील शेवटची सुमारे २० वर्षे पंजाबमधील गुरदासपूर जिल्ह्यापाशी असलेल्या 'घुमान' येथे व्यतीत केली. तेथे त्यांनी स्थानिक लोकांशी संवाद साधण्यासाठी त्यांची भाषा आत्मसात केली आणि भक्तीचे आंदोलन उभे केले.

संत नामदेवांच्या अध्यात्मिक उंचीचा आदर करून पाचवे गुरु श्री गुरु अर्जन देवजी यांनी 'गुरु ग्रंथ साहिब' या पवित्र ग्रंथामध्ये संत नामदेवांच्या ६१ पदांचा अंतर्भाव केला. आजही पंजाबच्या भूमीत 'भगत नामदेव' या नावाने ते तितकेच पूजनीय आहेत जितके ते महाराष्ट्रात आहेत. नामदेवांनी केवळ भक्तीच शिकवली नाही, तर समाजातील विषमता दूर करण्यासाठी प्रयत्न केले.त्यांच्या अभंगांमधून व्यक्त होणारा समतेचा विचार हाच पुढे शीख धर्माच्या पायाभरणीचा एक महत्त्वाचा भाग बनला.

गुरु हरगोविंद सिंग आणि समर्थ रामदास भेट

शीख इतिहासातील सहावे गुरु,श्री गुरु हरगोविंद सिंगजी आणि महाराष्ट्राचे संत समर्थ रामदास स्वामी यांची काश्मीरमधील श्रीनगर येथे झालेली भेट हा एक अत्यंत दिशादर्शक प्रसंग आहे.ही भेट 'भक्ती' आणि 'शक्ती' यांच्या समन्वयाचे उत्तम उदाहरण मानली जाते.

समर्थ रामदास स्वामींनी जेव्हा गुरुजींना पाहिले,तेव्हा गुरुजींनी कमरेला दोन तलवारी (मिरी आणि पिरी) बांधल्या होत्या आणि ते सैनिकांच्या वेषात घोड्यावर स्वार होते. एक संत अशा लष्करी थाटात पाहून समर्थांनी कुतूहलाने विचारले, तुम्ही एका महान आध्यात्मिक गादीचे उत्तराधिकारी आहात,मग संत असून शस्त्रे का बाळगता?. गुरु हरगोविंद सिंगजींनी समर्थांच्या डोळ्यांत पाहून उत्तर दिले, महाराज, अंतर्यामी मी केवळ 'बाबा नानकांचा' सेवक आहे आणि एक संतच आहे. पण ही शस्त्रे गरिबांच्या रक्षणासाठी आणि जुलमी सत्तेचा नायनाट करण्यासाठी आहेत. हे उत्तर ऐकताच समर्थ रामदास स्वामी भारावून गेले. त्यांना जाणीव झाली की केवळ जपमाळ ओढून धर्म टिकणार नाही, तर धर्माच्या रक्षणासाठी हातात शस्त्र असणेही तितकेच गरजेचे आहे.

नांदेडचे 'हुजूर साहिब' सामायिक श्रद्धेचे अधिष्ठान

गुरु गोविंद सिंगजींचे नांदेडमधील आगमन हे या अनुबंधाचे सर्वोच्च शिखर ठरले. नांदेडच्या याच भूमीत गुरूजींनी देहधारी गुरूची परंपरा संपवून शब्दरूपी 'गुरु ग्रंथ साहिब' यांना अंतिम गुरु मानण्याचा आदेश दिला. दक्षिणेतील हे शांत शहर गुरूंच्या पदस्पर्शाने पावन झाले आणि जगातील कोट्यवधी शीख बांधवांसाठी काशी-पंढरीप्रमाणे पवित्र बनले. हे स्थान केवळ शीखांचे नाही, तर महाराष्ट्राच्या समतेच्या परंपरेचे एक जिवंत प्रतीक आहे.

'दख्खनी' शीख: मातीशी एकरूप झालेला गौरवशाली वारसा

महाराष्ट्रातील शीख समुदायातील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण घटक म्हणजे 'दख्खनी' शीख. या समूहाचा इतिहास थेट गुरु गोविंद सिंगजींच्या १७०८ मधील दक्षिण प्रवासाशी जोडलेला आहे. हे समुदाय प्रामुख्याने त्या सैनिकांचे आणि कारागिरांचे वंशज आहेत जे गुरूंसोबत दक्षिणेत आले आणि नंतर याच मातीचे होऊन राहिले.

शिकलकार समुदाय: हे मूळचे शस्त्रे आणि धारदार उपकरणे बनवणारे अत्यंत कुशल कारागीर होते. गुरूंच्या लष्करी गरजा पूर्ण करण्यात या समुदायाचा मोठा वाटा होता.

बंजारा आणि लोभाणा: १६ व्या शतकापासूनच बंजारा समुदायाची नाळ शीख धर्माशी जोडलेली आहे. ऐतिहासिकदृष्ट्या हे समूह व्यापार आणि वाहतुकीच्या व्यवसायात अग्रेसर होते आणि त्यांनी गुरूंच्या चळवळीला मोठी रसद पुरवली.

सांस्कृतिक समन्वय: अनेक शतकांपासून महाराष्ट्रात राहिल्यामुळे या दख्खनी शीखांनी स्थानिक मराठी संस्कृती, भाषा आणि चालीरीती आपलेसे केले आहेत. त्यांची पंजाबी ओळख काहीशी बदलली असली, तरी गुरूंप्रति असलेली त्यांची निष्ठा आजही अभंग आहे.

# श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी वर्षानिमित्त निघालेल्या भव्य नगर कीर्तनात अभूतपूर्व उत्साह!



## 'बोले सो निहाल'चा जयघोष, हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी



**नांदेड/प्रतिनिधी:** 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या महान शहीदी समागम सोहळ्यानिमित्त आज नांदेड नगरी भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाली. 'बोले सो निहाल... सत श्री अकाल'चा गगनभेदी जयघोष, आकाशातून हेलिकॉप्टरद्वारे होणारी पुष्पवृष्टी आणि या सोहळ्यात संत, भाविक, लोकप्रतिनिधी यांच्यासह प्रशासकीय अधिकारी यांचा ओसंडून वाहणारा उत्साह... अशा पवित्र आणि मंगलमय वातावरणात आज भव्य 'नगर कीर्तन' सोहळा पार पडला.

या ऐतिहासिक नगर कीर्तनाला आज (दि. २४) सकाळी ८ वाजता तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब जी येथून प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुरुद्वारामध्ये विधिवत अरदास करण्यात आली. यानंतर गुरुद्वाराच्या गेट क्रमांक १ जवळ श्री गुरु ग्रंथ साहिबजींची पालखी येताच नांदेड पोलीस दलाच्या वतीने (Guard of Honor) विधिवत 'मानवंदना' देण्यात आली. या सोहळ्याचे सर्वात विलोभनीय दृश्य म्हणजे हेलिकॉप्टरने गुरुद्वारावर केलेली पुष्पवृष्टी.

भव्य नगर कीर्तन मुख्य जत्थेदार संत बाबा कुलवंत सिंघ जी, भाई जोतिनदर सिंघ जी, मुख्य ग्रंथी भाई कश्मीर सिंघ जी, भाई रामसिंघ जी, भाई गुरुमीत सिंघ जी या पंच प्यारे साहिबान यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली काढण्यात आले.

सुशोभित आणि भव्य रथामध्ये श्री गुरु ग्रंथ साहिबजी विराजमान होते. या पवित्र पालखीमध्ये भाई कश्मीर सिंघ जी यांनी पवित्र सेवा अत्यंत भक्तीभावाने केली.

राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, खासदार अशोक चव्हाण, शहीदी समागम समितीचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक आदींसह लोकप्रतिनिधी यांनी विशेष उपस्थिती लावून गुरुचरणी नतमस्तक होत कीर्तनात सहभाग नोंदवला.

तसेच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार (भा.पो.से.) आणि नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकाचे आयुक्त महेशकुमार डोईफोडे, गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग (से .नि. भाप्रसे), त्यांचे सहकारी जसविंत सिंघ (बॉबी) आणि अधीक्षक हरजितसिंग कडेवाले यांनीही उपस्थित राहून नियोजनात सक्रिय सहभाग घेतला.

या नगर कीर्तनात शीख धर्माची परंपरा आणि महाराष्ट्राची लोकधारा यांचा संगम पाहायला मिळाला. मिरवणुकीच्या अग्रभागी शीख तरुणांची थरारक 'गतका' प्रात्यक्षिके लक्ष वेधून घेत होती, तर हजारो शालेय विद्यार्थिनींनी सादर केलेले 'लेझिम' नृत्य आणि ढोल-ताशांचा गजर वातावरणात उत्साह भरत होता. एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी हातात 'मानवता की सच्ची मिसाल' आणि 'हिंद दी चादर' असे फलक घेऊन सामाजिक संदेश दिला.

नगर कीर्तन गुरुद्वारा गेट क्रमांक १ वरून गुरुद्वारा चौक, महावीर चौक, वजिराबाद, तिरंगा चौक, रामसेतू, रवी नगर, नागार्जुन स्कूल मार्गे मुख्य कार्यक्रमस्थळी म्हणजेच 'मोदी मैदान' येथे पोहोचले.

शालेय विद्यार्थ्यांकडून स्वागत

गेट क्रमांक १ ते मोदी मैदान या अंदाजे चार किलोमीटरच्या मार्गावर एक अद्भुत दृश्य पाहायला मिळाले. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी हजारो शालेय विद्यार्थ्यांनी रांगा लावून शिस्तीत उभे राहत रथाचे भव्य स्वागत केले आणि गुरु ग्रंथ साहिबजींचे दर्शन घेतले. विद्यार्थ्यांनी केलेली फुलांची उधळण आणि त्यांचा उत्साह पाहून उपस्थित भारावून गेले. या संपूर्ण मार्गावर नांदेडकरांनी आपल्या घरांसमोर सडा-रांगोळी काढून नगर कीर्तनाचे जंगी स्वागत केले.

# भक्तीमय वातावरणात श्री गुरुग्रंथ साहिबांचे विधीवत विराजमान



**नांदेड/प्रतिनिधी:** असर्जन परिसरीतील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या मुख्य मंडपात आज श्री गुरुग्रंथ साहिबांचे अत्यंत भक्तीमय व मंगल वातावरणात विधीवत विराजमान झाले.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर हा सोहळा पार पडला. विराजमान प्रसंगी गुरुबाणीचे मंगल पठण, अरदास व कीर्तन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. गुरुबाणीच्या मधुर स्वरांनी संपूर्ण परिसर आध्यात्मिकतेने भारावून गेला. भाविकांनी सर्व मर्यादांचे पालन करीत शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन घेत गुरुग्रंथ साहिबांना नमन केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने नांदेड शहर व परिसरात उत्साहाचे वातावरण असून, देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांच्या स्वागतासाठी प्रशासन व विविध सामाजिक संघटनांनी आवश्यक ती तयारी पूर्ण केली आहे. भाविकांच्या सोयीसाठी दर्शन, स्वच्छता, पाणी व सुरक्षा यासह सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या बलिदानाचे स्मरण करून धर्म, मानवता व सहिष्णुतेचा संदेश देणारा हा समागम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# रासेयोतून राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होते: डॉ. मारोती गायकवाड संचालक स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड



**लातूर/प्रतिनिधी:** आजचे महाविद्यालयीन युवक - युवती उद्याचे आधारस्तंभ आहेत. या स्वंयसेवकामधूनच उद्याचे शास्त्रज्ञ,अभियंते, शिक्षणतज्ञ, पत्रकार, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, विचारवंत, व्यावसायिक, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, वक्ते, साहित्यिक सुजान आदर्श नागरिक निर्माण होणार आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेमुळेच विद्यार्थिनींच्या मनामध्ये संवेदनशील भावना, मानवी मूल्यांची रुजवन होते.असे प्रतिपादन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचलित श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे खोपेगाव ता. जि. लातूर येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक श्रमसंस्कार युवती शिबीराच्या उद्धाटन समारंभ निमित्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे रासेयोचे संचालक डॉ.मारोती गायकवाड यांनी केले केले.

यावेळी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशा मुंडे, उद्घाटक मांजरा चॅरिटेबल ट्रस्टचे प्रशासकीय अधिकारी मा. प्राचार्य डॉ. अजय पाटील, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे माजी संचालक डॉ. दिगंबर नेटके, सरपंच सौ. सरस्वती रमेश मोरे, श्री. रमेश मोरे, उपसरपंच श्री अतुल पवार, ग्रामपंचायत अधिकारी श्री परमेश्वर शिरुरे, ग्रामपंचायत सदस्य श्री बालाजी म्हेत्रे, श्री विनायक डेंगळे माजी सरपंच प्रल्हाद मोरे, माजी उपसरपंच श्री परमेश्वर पवार, विलास मोरे, श्री शरद पवार श्री शशिकांत मोरे, शिवाजी गायकवाड, लक्ष्मण मोरे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. आर. एस. कांबळे, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. रुपाली कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे आपल्या भाषणामध्ये डॉ. मारोती गायकवाड म्हणाले की, not me but you मी माझ्यासाठी नाही तर आपल्यासाठी, समाजासाठी या ध्येयानुसारच सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक कार्य करीत असतात.

covid-19 मध्ये संपूर्ण जग एका महाभयानक संकटाच्या गर्तेमध्ये सापडले होते. अनेक नागरिकांना याच्या प्रचंड झळा सोसाव्या लागल्या आहेत. अशा भेदक, कठीण कोरोना प्रसंगी महाविद्यालयीन रासेयोच्या अनेक

विद्यार्थ्यांनी कोरोना संक्रमण रोखन्यासाठी आपला हातभार लावला आहे.एवढेच नव्हे तर, स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अहोरात्र परिश्रम घेऊन कोरोना बाधित व्यक्तींना मदत करण्याचे मौलिक कार्य त्यानी केले आहे. एकूणच, राष्ट्रीय सेवा योजनेमुळे राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होते असे विचार त्यांनी मांडले.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन , मातोश्री सुशीलादेवी देशमुख तसेच, नेताजी सुभाषचंद्र बोस , बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. आर. एस. कांबळे यांनी जलसंधारण व्यवस्थापन, आणि ओसाड भूमी विकास' या संकल्पनेवर आधारित श्रमसंस्कार सात दिवशीय शिबीरात राष्टीय एकात्मता, ग्राम स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, सायबर लिटरशी, डिजिटल साक्षरता, वृक्षारोपण, ओसाड भूमीचा पुनर्विकास , पंडीत दिनदयाळ उपाध्याय यांचा मानवतावाद, एड्स जनजागृती, पर्यवरण संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन, जलसंधारण,महिला सबलीकरण आदी विविध विषयावर मान्यवरांचे व्याख्यान संपन्न होणार आहेत. तसेच ग्राम सर्वे, श्रमदान, आरोग्य शिबीर, पशु चिकित्सा शिबीर,गट चर्चा, बौद्धिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमाविषयी माहिती सांगितले.

या समारंभाचे प्रमुख उद्घाटक मांजरा चॅरिटेबल ट्रस्टचे प्रशासकीय अधिकारी मा.प्राचार्य डॉ.अजय पाटील यांनी रासेयो स्वयंसेवकानी शिबीरात श्रमदान,पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण आणि बौद्धिक चर्चा व व्याख्यानातून मिळालेल्या विविधांगी ज्ञानाची शिदोरी ही गाव,ग्रामसंस्कृती समाजाच्या, राष्ट्राच्या विकासासाठी केले पाहिजे. तसेच शहराच्या जवळील खेडेगाव हे समृद्ध, संपन्न होत आहेत त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अजय पाटील यांनी केले .

यावेळी डॉ.दिगंबर नेटके यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना, उद्देश भूमिका विशद करताना म्हणाले की, भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो खेडे हे भारतीय संस्कृतीचे उगमस्थान आहे भारतीय खेडे भारताचा आत्मा आहे व शेती हे खेड्यातील लोकांच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन आहे. खेड्यांचा विकास झाला तरच भारताचा विकास होईल म्हणून महात्मा गांधी यांनी खेड्याकडे चला अशी हाक दिली. खेड्यातील किंवा ग्रामीण भागातील नित्याचे प्रश्न आजही आहेत. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थीनी ग्रामीण भागांमध्ये एखाद्या गावांमध्ये - शहरामध्ये जाऊन तेथील सर्वच समस्या, प्रश्न सोडवू शकत नाहीत परंतु गावातील लोकांना त्यांच्या समस्या कशा सोडवल्या पाहिजेत, स्वच्छ व समृद्ध गाव - शहर निर्माण करण्यासाठी गावातील प्रत्येक व्यक्तीमध्ये सुसंवाद निर्माण होऊन श्रमप्रतिष्ठा मूल्य रुजले पाहिजे. याविषयी ग्रामीण भागामध्ये किंवा खेडेगावात जाणीव जागृती करण्याचे विधायक कार्य रासेयो चे विद्यार्थी करीत असतात त्यातूनच समाज बांधनीला सुरुवात होत असते. हे मौलिक कार्य आज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील तरुण राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामधून करीत आहेत.असे मौलिक विचार त्यांनी मांडले.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.आशा मुंडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून खेड्यामध्ये किंवा गावामध्ये जलव्यवस्थापन, अंधश्रद्धा निर्मूलन याविषयी गावातील नागरिकांना जनजागृती करण्याचे मौलिक कार्य या सात दिवशीय श्रमसंस्कार शिबिरामधून स्वयंसेवक विद्यार्थिनी करीत असतात. त्यामुळे अशा शिबिरामध्ये गावातील नागरिकांनी व विद्यार्थिनीने मोठया संख्येने सह भागी व्हावे त्यातूनच आपल्या गावाचा, समाजाचा, राष्ट्राचा विकास होतो असे विचार प्राचार्य डॉ. आशा या मुंडे यांनी मांडले.

या कार्यक्रमाच्यावेळी राष्ट्रीय मतदार दिन निमित्त सामूहिक शपथ घेण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर देशमुख डॉ. संग्राम टेकले यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी मानले. या समारंभाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. या कार्यक्रमाच्यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंद-दी-चादर समागमात श्री गुरु ग्रंथसाहिबजींच्या दर्शनासाठी भाविकांची महासागरासारखी गर्दी

**- मान्यवरांसह हजारो भाविकांची हजेरी**

**- श्री गुरु ग्रंथसाहिबजींच्या दर्शनाने भक्तीचा महासंगम**





**नांदेड/प्रतिनिधी:** हिंद-दी-चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे आयोजित भव्य कार्यक्रमात आज राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार आनंदराव तिडके, आमदार श्रीजया चव्हाण, पोहरादेवीचे, महंत, सुनील महाराज,बाबुसिंग महाराज, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोड यांच्यासह हजारो भाविकांनी श्री गुरु ग्रंथसाहिबजी यांचे पावन दर्शन घेतले. सकाळपासूनच मोदी मैदान येथे दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या असून संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे.

सर्व जिल्ह्यातून व नांदेड शहरातून आलेल्या हजारो भाविकांनी शांतता, शिस्त व श्रद्धेने दर्शनाचा लाभ घेत आहेत. भाविकांच्या सोयीसाठी आयोजकांच्यावतीने चोख व्यवस्था करण्यात आली असून स्वयंसेवक व सेवाभावी संस्थांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम सुरळीतपणे सुरू आहे. भाविकांच्या भोजनासाठी भव्य लंगरची व्यवस्था केली असून भाविक याचा लाभ घेताना दिसून येत आहेत. गुरुद्वारातर्फे भाविकांसाठी अखंड कीर्तन सुरू आहे.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या त्याग, धर्मनिष्ठा व मानवतेच्या संदेशाचे स्मरण या शहीदी समागमाच्या माध्यमातून करण्यात येत असून या कार्यक्रमातून समाजात बंधुता व एकतेचा संदेश पोहोचत आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ आंब्याचे झाड शेतात लावून रक्षा विसर्जित... अंधश्रद्धेला मूठमाती : रणदिवे परिवाराच्या निर्णयाचे सर्वत्र कौतुक



कळंब (प्रतिनिधी)-प्रचलित रूढी परंपरा व अंधश्रद्धेला मुठमाती देऊन वडिलांच्या निधनानंतर नदीच्या पाण्यात रक्षा विसर्जित न करता शेतामध्ये आंब्याचे झाड लावून रक्षा विसर्जित करण्याचा ऐतिहासिक निर्णय रणदिवे परिवाराने घेतल्याने ईटकुर (ता.कळंब) परिसरात त्यांचे कौतुक केले जात आहे.

ज्येष्ठ पत्रकार शिरीषकुमार रणदिवे,ऍड.सतिशकुमार रणदिवे व विजयकुमार रणदिवे यांचे वडील माजी सैनिक अण्णासाहेब गोविंदराव रणदिवे (वय ८५)यांचे शनिवारी (१७ जानेवारी २०२६) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी भारत पाकिस्तान (१९६२) युद्धात सेवा बजावली होती. रक्षाविसर्जन नदी पात्रात पाण्यामध्ये परंपरेनुसार करण्याची प्रथा आहे .परंतु नदीचे प्रदूषण होऊ नये. पाणी दूषित होऊ नये.जलचर प्राण्यांना हानी पोहचू नये, पर्यावरणाचा समतोल राखला जावा या उदात्त हेतूने रक्षा विसर्जन पाण्यात न करण्याचा निर्णय रणदिवे परिवाराने घेतला. वडिलांच्या स्मृती कायम स्मरणात राहाव्यात यासाठी शेतामध्ये आंब्याचे झाड लावून रक्षा विसर्जित करण्यात आली.समाजाला या कृतीतून पर्यावरणाचा संदेश दिला आहे. त्यामुळे रणदिवे कुटुंबीयांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

खऱ्या अर्थाने सध्या स्थितीत पर्यावरणाची खूप हानी होत आहे .पर्यावरण चांगले राहिले तर सर्वांना ऑक्सिजन मिळणार आहे. परिणामी आरोग्य चांगले राहणार आहे.त्यामुळे पर्यावरण टिकवणे ही आपली जबाबदारी समजून आपल्यापासूनच सुरुवात करावी ही भावना मनामध्ये आल्यामुळे वडिलांच्या रक्षा विसर्जन या शेतात आंब्याचे झाड लावून करण्याचा निर्णय आम्ही घेतला. विशेषत: आईने यासाठी आग्रह धरला.

सर्वांनी हा सामाजिक संदेश स्वीकारला. जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकाने पाणी दूषित होऊ नये पर्यावरण टिकावे यासाठी रक्षा विसर्जन हे शेतामध्ये झाड लावून करावे अशी अपेक्षा जेष्ठ पत्रकार शिरीषकुमार अ. रणदिवे यांनी व्यक्त केली आहे.

# हिंद-दी-चादर’ ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त जिल्हास्तरीय शैक्षणिक स्पर्धांचा उत्साहपूर्ण समारोप

धाराशिव (जिमाका) हिंद-दी-चादर म्हणून ओळखले जाणारे शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहाद्दूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त त्यांच्या त्यागशील जीवनकार्याचा,तत्त्वज्ञानाचा व सामाजिक योगदानाचा प्रसार विद्यार्थ्यांमध्ये व्हावा,या उदात्त उद्देशाने अल्पसंख्यांक विभाग तसेच राज्यस्तरीय समागम समिती, महाराष्ट्र राज्य शासन व जिल्हा परिषद धाराशिव (शिक्षण विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

या जिल्हास्तरीय स्पर्धा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष,शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती सुधा साळुंखे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. नागेश मापारी यांच्या मार्गदर्शनात यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आल्या.जिल्हा परिषद कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला,धाराशिव येथे या स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या.

स्पर्धांचे उद्घाटन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती सुधा साळुंके यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी बोलताना श्रीमती. साळुंके म्हणाल्या की,श्री गुरु तेग बहाद्दूर साहेबजी यांचे जीवन हे त्याग,सत्य आणि मानवतेचे तेजस्वी प्रतीक आहे.त्यांच्या विचारांतून विद्यार्थ्यांना धैर्य,मूल्यनिष्ठा व सामाजिक बांधिलकीची प्रेरणा मिळते. अशा उपक्रमांमुळे इतिहास जिवंत राहतो आणि नव्या पिढीला योग्य दिशा मिळते.




या प्रसंगी स्पर्धा प्रमुख विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रीमती रंजना मैंदर्गी,महाराष्ट्र शासन राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त भैरवनाथ कानडे, केंद्रप्रमुख निलेश नागले,लक्ष्मण पाटील,समीर जाधव,बी.एम. आडगळे,समीर सय्यद,सुहास लोमटे, राजाभाऊ गिरी,श्री.विनोद जानराव, मुख्याध्यापिका सुनीता इंगळे तसेच राजेंद्र अत्रे आदी मान्यवर उपस्थित होते.या जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये वक्तृत्व, गायन,चित्रकला व निबंध लेखन अशा विविध स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता.

विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून श्री गुरु तेग बहाद्दूर साहेबजी यांच्या शौर्य,बलिदान, धर्मस्वातंत्र्यासाठी दिलेले योगदान तसेच सर्वधर्मसमभाव व मानवतेचा संदेश प्रभावीपणे मांडला.वक्तृत्व स्पर्धेत ओघवत्या भाषेत विचारांची प्रभावी मांडणी करण्यात आली, गायन स्पर्धेतून भक्ती व देशप्रेमाची भावना व्यक्त झाली,चित्रकलेतून त्याग व शौर्याचे दृश्यरूप साकारले गेले,निबंध लेखनातून विद्यार्थ्यांची अभ्यासपूर्ण व चिंतनशील दृष्टी अधोरेखित झाली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विस्तार अधिकारी श्रीमती रंजना मैंदर्गी यांनी, सूत्रसंचालन भैरवनाथ कानडे यांनी केले तर आभार समीर जाधव यांनी मानले.

# गेट-केन उमेदवार नको, मतदारसंघातीलच उमेदवार हवा! जनतेच्या हाकेला प्रतिसाद देत पळसप गटातून अजित लाकाळ यांची उमेदवारी पक्की



धाराशिव (रामेश्वर डोंगरे )-पळसप तालुक्यात सध्या एकच आवाज ठामपणे ऐकू येत आहे - गेट- केन उमेदवार नको, मतदारसंघातीलच उमेदवार पाहिजे! हीच सर्वसामान्य मतदारांची एकमुखी हाक असून, या जनभावनेला खरी दिशा देणारे नेतृत्व म्हणजे शिवसेना शिंदे गटाचे तालुका प्रमुख अजित लाकाळ.

पळसप गटातून शिवसेना शिंदे गटाची उमेदवारी अजित लाकाळ यांना पक्की होण्यामागे कोणतेही राजकीय सौदे नसून, जनतेतून केलेले सातत्यपूर्ण काम हाच त्यांचा खरा आधार आहे. गावोगावी फिरून लोकांचे प्रश्न समजून घेणारा, संकटात धावून जाणारा आणि प्रत्येक सामान्य माणसाशी थेट संवाद ठेवणारा नेता म्हणून अजित लाकाळ यांची ओळख पक्की झाली आहे.

अजित लाकाळ हे बाहेरून लादलेले किंवा गेट- केन उमेदवार नसून, याच मातीतील, याच मतदारसंघात वाढलेले नेतृत्व आहे. त्यामुळेच रस्ते, पाणीपुरवठा, वीज, शिक्षण, आरोग्य, युवक व महिलांचे प्रश्न अशा प्रत्येक विषयावर ते मनापासून काम करताना दिसतात. मोठे पद नसतानाही त्यांनी स्वतःच्या सामाजिक कार्याच्या जीवावर जनतेचा विश्वास मिळवला आहे.

पळसप गटातील मतदारांमध्ये आज स्पष्ट वातावरण आहे की, मतदारसंघातीलच उमेदवार हवा, जो लोकांमध्ये राहतो, लोकांसाठी काम करतो. हीच भावना अजित लाकाळ यांच्या पाठीशी उभी राहिल्याने पळसप गटातून मतदार नक्कीच त्यांनाच कौल देतील, असा ठाम विश्वास व्यक्त केला जात आहे.

सामाजिक कार्य असो किंवा समाजकारण, प्रत्येक ठिकाणी पुढाकार घेणारा नेता म्हणून अजित लाकाळ यांचे नाव घेतले जाते. त्यामुळेच शिवसेना शिंदे गटाने त्यांच्या कार्यावर विश्वास ठेवत पळसप गटातून उमेदवारी पक्की केली आहे. ही उमेदवारी म्हणजे पक्षाचा निर्णय नसून, जनतेच्या भावनांवर उमटलेली मोहोर असल्याचे बोलले जात आहे.

एकूणच, अजित लाकाळ यांची उमेदवारी ही पैसा, दबाव किंवा गटबाजीवर आधारित नसून, काम करणारा, लोकांत राहणारा आणि मतदारसंघातीलच नेता हवा या जनतेच्या एकमुखी मागणीचे प्रतीक आहे. येणाऱ्या निवडणुकीत हीच हाक मतपेटीतून मोठ्या ताकदीने उमटणार, हे मात्र नक्की!

# ही निवडणूक सत्तेसाठी नाही, तर स्वाभिमानासाठी! कार्यकर्त्यांच्या अस्तित्वाची लढाई लढणारे धनंजय सावंत मैदानात



धाराशिव (शेख अंजुम ) जिल्ह्यातील राजकारणात सध्या एक वेगळीच चर्चा रंगत आहे. माननीय आमदार तानाजी सावंत यांचे पुतणे, शिवसेनेतील अभ्यासू आणि ठाम भूमिका घेणारे नेते धनंजय सावंत यांनी स्पष्ट शब्दांत आपली भूमिका मांडत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे.

ही लढाई माझ्यासाठी नाही, कोणत्याही पदासाठी नाही; ही लढाई माझ्या कार्यकर्त्यांच्या अस्तित्वासाठी आहे, असे ठणकावून सांगत धनंजय सावंत यांनी संघर्षाची दिशा स्पष्ट केली आहे.

राजकारणात पद, प्रतिष्ठा आणि सत्तेची गणिते मांडली जात असताना, धनंजय सावंत यांनी मात्र तळागाळातील कार्यकर्त्यांना केंद्रस्थानी ठेवणारी भूमिका घेतली आहे. वर्षानुवर्षे पक्षासाठी रस्त्यावर उतरून झगडणाऱ्या, अन्याय सहन करणाऱ्या कार्यकर्त्यांचा आवाज दाबला जात असल्याचा थेट आरोप त्यांनी केला आहे.

कार्यकर्ता फक्त निवडणुकीपुरता वापरायचा आणि नंतर बाजूला फेकायचा - हा प्रकार आता खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

ही लढाई कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून अन्यायकारक राजकीय प्रवृत्तीविरोधात आहे, असे सांगत धनंजय सावंत म्हणाले की,

मी आजही सामान्य कार्यकर्ता आहे. माझा संघर्ष वैयक्तिक नाही, तो सामूहिक आहे. ज्यांनी पक्षासाठी रक्त-घाम गाळला, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, हाच माझा अजेंडा आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था असोत वा आगामी निवडणुका - या सगळ्यांमध्ये कार्यकर्त्यांचे अस्तित्व संपवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या धोरणांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

निवडणूक ही फक्त खुर्चीसाठी नसते, ती विचारांसाठी आणि स्वाभिमानासाठी असते, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले.

धनंजय सावंत यांच्या या भूमिकेमुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. सत्तेच्या समीकरणांपेक्षा कार्यकर्त्यांचा स्वाभिमान मोठा मानणारी ही भूमिका आगामी राजकारणाला नवी दिशा देणार, यात शंका नाही.

# तलावातील पानबुडी मोटर, केबल, बोअरवेलमधील मोटारीची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी आशिष शिवाजी सुर्यवंशी, वय ३६ वर्षे, रा. सांजा ता. जि. धाराशिव यांचे उपळा शिवारातील वरुडा साठवण तलावातील पानबुडी मोटर, १४० फुट केबल, शेजारील शेतकरी यांचे बोअरवेल मधील मोटर, वायर व ईलेक्ट्रीक मोटर असा एकुण५९,१००किंमतीचे दि.२२.०१.२०२६ रोजी २०.०० ते दि. २३.०१.२०२६ रोजी ०६.०० वा. सु अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-आशिष सुर्यवंशी यांनी दि.२३.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# पळसपमध्ये आयात प्रयोग चालणार का? की काम करणाऱ्या स्थानिक नेतृत्वालाच संधी मिळणार?

धाराशिव (रामेश्वर डोंगरे )-पळसप जिल्हा परिषद गटात उमेदवारीचा प्रश्न दिवसेंदिवस अधिकच गुंतागुंतीचा होत चालला आहे. महायुतीत अंतर्गत अस्वस्थता वाढत असताना, एक मूलभूत प्रश्न आता ऐरणीवर आला आहे - पळसपमध्ये आयात उमेदवार लादला जाणार की स्थानिक, काम करणाऱ्या नेतृत्वालाच संधी दिली जाणार?

पळसप मतदारसंघातील वातावरण पाहता, मतदार आणि कार्यकर्त्यांमध्ये एकच चर्चा सुरू आहे.

निवडणूक जवळ आली की दिसणारा चेहरा हवा की वर्षानुवर्षे आमच्या समस्या सोडवणारा माणूस?

हा प्रश्न आता थेट पक्षाच्या निर्णयप्रक्रियेलाच आव्हान देताना दिसत आहे. मतदारसंघात अनेक वर्षांपासून सामाजिक आणि विकासकामांमध्ये सक्रिय असलेले स्थानिक नेतृत्व हे लोकांच्या सुख-दुःखात सहभागी राहिले आहे. रस्ते, पाणी, वीज, प्रशासनातील अडचणी, सामान्य नागरिकांचे प्रश्न - या सगळ्यांत स्थानिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. मात्र तरीही जर बाहेरून उमेदवार आणण्याचा प्रयत्न झाला, तर त्याला तीव्र विरोध होणार, अशी स्पष्ट भावना व्यक्त होत आहे.

राजकीय वर्तुळात चर्चेनुसार, मतदारसंघाची दिशा ठरवणारे प्रभावी नेतृत्व काम, निष्ठा आणि स्थानिक विश्वास या निकषांवरच उमेदवारी ठरावी, यावर ठाम आहे. त्यांनी स्थानिक कार्याची प्रत्यक्ष पाहणी करून, आयात प्रयोग टाळण्याचा सल्ला दिल्याचीही चर्चा आहे.

पण खरा प्रश्न असा आहे की -

पक्ष नेतृत्व स्थानिक इच्छेचा सन्मान करणार का?

की वरून निर्णय लादून मतदारसंघात असंतोष निर्माण केला जाणार?

राजकीय अभ्यासकांच्या मते, स्थानिक उमेदवार डावलल्यास याचा थेट परिणाम निवडणुकीवर होऊ शकतो. सध्या निर्माण झालेल्या वातावरणात, बंडखोरी, नाराजी आणि मतविभाजनाची शक्यता नाकारता येत नाही.

एकूणच, पळसप गटात आज चित्र स्पष्ट आहे, पण उत्तर अजून बाकी आहे -

पळसपमध्ये कामाला न्याय मिळणार




की आयात प्रयोगाला संधी दिली जाणार?

हा निर्णयच येत्या निवडणुकीची दिशा ठरवणार आहे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649